रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक १३
www.ramprahar.com

◆ गुरुवार, ३० जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

‘महायुती सरकारचे मराठा समाजासाठी सर्वाधिक काम’/२

मुरूडच्या वादळग्रस्तांना पतसंस्थेकडून आधार/५

राष्ट्रीय मास्टर पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडचे यश/८

## राज्यातील शाळा परिसरात जंक फूडच्या विक्रीवर बंदी



**मुंबई :** शालेय विद्यार्थ्यांचे आरोग्य जपण्यासाठी आणि त्यांना लहान वयातच लठ्ठपणा तसेच विविध आजारांपासून दूर ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) कठोर नियमावली आणली आहे. राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय आणि खासगी शाळांच्या ५० मीटर परिघात उच्च चरबीयुक्त, जास्त मिठाचे आणि अतिरिक्त साखर असलेल्या जंक फूडच्या विक्रीवर पूर्णपणे बंदी घालण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. नवीन नियमावलीनुसार शाळेच्या ५० मीटरच्या परिघात कार्यरत असलेली दुकाने, लहान-मोठे स्टॉल्स आणि खाद्यपदार्थ पुरवठादारांना अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाचे सर्व नियम पाळणे अनिवार्य असणार आहे. या परिघात अतिरिक्त फॅट्स, जास्त साखर आणि सोडियमचे प्रमाण असलेल्या प्रक्रियायुक्त खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कायद्याचा बडगा उगारला जाणार आहे.

# परीक्षा सुधारणा विधेयक लोकसभेत मंजूर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पेपरफुटीच्या घटना आणि परीक्षांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने कठोर पाऊल उचलले आहे. केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी लोकसभेत मांडलेले सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकार प्रतिबंधक) सुधारणा विधेयक बुधवारी (दि.२९) आवाजी मतदानाद्वारे मंजूर करण्यात आले. आता हे विधेयक मंजुरीसाठी राज्यसभेत पाठवले जाईल.



लोकसभेत विधेयक संमत होत असताना सभागृहात विरोधकांचा गदारोळ सुरूच होता. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दिल्लीतील जंतरमंतर येथे कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनादरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी विद्यार्थ्यांवर बळप्रयोगाचे आदेश दिले होते, असा गंभीर आरोप केला. यावरून सभागृहात खडाजंगी झाली. याशिवाय चर्चेदरम्यान राहुल गांधी यांनी वापरलेल्या असंसदीय शब्दावरून सभागृहातील वातावरण अधिकच तापले.

यावर बोलताना केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. विरोधक विद्यार्थ्यांच्या आणि परीक्षांच्या मुद्द्याचे राजकीयीकरण करत आहेत, असे सांगून मंत्री सिंह म्हणाले, विरोधी पक्षनेत्यांनी वापरलेले शब्द हे असंसदीय आहेत. कोणी स्वतःला कितीही काही समजत असले, तरी संसदेत असे शब्द वापरता येत नाहीत. विरोधी पक्षनेत्याला संसदेच्या नियमांची आणि परंपरेची साधी जाणीवही असू नये, याचे मला अत्यंत आश्चर्य वाटते. जेव्हा विरोधी पक्षनेते असे म्हणतात की, ते हे शब्द कोणा एका विशिष्ट व्यक्तीसाठी वापरत नाहीत, तेव्हा ते देशातील आपल्या विद्यार्थ्यांनाच तर असे म्हणत नाहीत ना? असा मोठा संशय निर्माण होतो.

गृहमंत्री अमित शाहांवर राहुल गांधींनी केलेल्या आरोपांचाही मंत्री जितेंद्र सिंह यांनी समाचार घेतला. “जेव्हा राहुल गांधी असा दावा करतात की, गृहमंत्र्यांनी विद्यार्थ्यांवर गोळीबार करण्याचे आदेश दिले, तेव्हा त्यांचे अज्ञान उघडे पडते. अशा प्रकारच्या कारवाईचे किंवा गोळीबाराचे आदेश हे उपविभागीय दंडाधिकारी, दंडाधिकारी किंवा जिल्हाधिकारी देतात. तिथे कोणताही गोळीबार झालेला नाही. फक्त अश्रूधुराचा वापर करण्यात आला होता. राहुल गांधी यांच्या या वक्तव्यावरून स्पष्ट होते की, त्यांना या प्रक्रियेची काहीही माहिती नाही” याकडे मंत्री सिंह यांनी लक्ष वेधले.

### शिक्षा आणि दंड

या नव्या आणि सुधारित कायद्यानुसार पेपरफुटी आणि परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या व्यक्तीला १० वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि ५० लाख रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते, तर संघटित गुन्हेगारी करणाऱ्या टोळ्यांना चाप लावण्यासाठी १० कोटी रुपयांपर्यंतचा दंड ठोठावला जाऊ शकतो.

### न्यायालयीन प्रक्रिया

पेपरफुटीसंदर्भातील सगळी प्रकरणे फास्ट ट्रॅक कोर्टात चालवली जातील आणि न्यायदान तसेच लवकरात लवकर म्हणजे दोन महिन्यांच्या आत तपास पूर्ण करून पुढील तीन महिन्यांत न्यायालयात निर्णय दिला जाईल. म्हणजेच गुन्हा दाखल झाल्यापासून पुढच्या पाच महिन्यांत न्यायदान होईल.




## न्हावाशेवा टप्पा ३ पाणीपुरवठा योजनेसंदर्भात मंत्री गुलाबराव पाटील यांच्यासोबत बैठक

### आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती; कामांचा आढावा

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रात पाणीपुरवठा करण्यासंदर्भात न्हावाशेवा टप्पा ३ योजनेच्या कामांचा आढावा घेण्यासाठी राज्याचे पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील आणि पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि.२९) मुंबई येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी योजनेच्या सद्यस्थितीचा सखोल आढावा घेत नागरिकांना मुबलक व नियमित पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला.

या बैठकीला महापौर नितीन पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांच्यासह संबंधित पाणीपुरवठा व नगरविकास विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान न्हावाशेवा टप्पा ३ योजनेंतर्गत सुरू असलेल्या विविध कामांची प्रगती, प्रत्यक्ष अंमलबजावणीतील तांत्रिक व प्रशासकीय बाबी तसेच उद्भवणाऱ्या अडचणींवर चर्चा झाली. त्याचप्रमाणे नागरिकांना शुद्ध, पुरेसा आणि अखंडित पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी तातडीने कोणत्या उपाययोजना आखल्या पाहिजेत यावरही चर्चा करण्यात आली. (पान २ वर..)

## राज्यात १ ऑगस्टपासून १२ सागरी मैलांपलीकडे मासेमारी करण्यास परवानगी

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या सागरी किनारपट्टीवर सुरू असलेल्या पावसाळी मासेमारी बंदीबाबत मत्स्यव्यवसाय विभागाने महत्त्वाची आणि नवीन माहिती जारी केली आहे. किनाऱ्यापासून १२ सागरी मैलांपलीकडील क्षेत्रात (विशेष आर्थिक क्षेत्र-ईईझेड) १ ऑगस्टपासून मासेमारी करण्यास परवानगी देण्यात आली आहे, मात्र राज्याच्या प्रादेशिक जलक्षेत्रात (किनाऱ्यापासून १२ सागरी मैलांपर्यंत) १५ ऑगस्टपर्यंत बंदी कायम राहणार आहे.

केंद्र शासनाच्या १६ मार्चच्या आदेशानुसार पश्चिम किनारपट्टीवरील ईईझेड क्षेत्रात १ जून ते ३१ जुलै(६१ दिवस)पर्यंत पावसाळी मासेमारी बंदी घोषित करण्यात आली होती. त्यामुळे १ ऑगस्टपासून या क्षेत्रात मासेमारी करण्यास केंद्र शासनाकडून कोणतेही निर्बंध लागू नाहीत. पात्र मासेमारी नौका नियमांचे पालन करून या क्षेत्रात मासेमारी करू शकतात. राज्याच्या जलधी क्षेत्रात (किनाऱ्यापासून १२ सागरी मैलांपर्यंत) यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौकांसाठी १ जून ते १५ ऑगस्ट (एकूण ७६ दिवस) या कालावधीत पावसाळी मासेमारी बंदी लागू आहे. या कालावधीत या क्षेत्रात कोणत्याही प्रकारची मासेमारी करण्यास सक्त मनाई आहे.

## अराजकता पसरवणे हाच राहुल गांधींचा एकमेव अजेंडा -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

“राहुल गांधी यांना देशाशी काहीच घेणेदेणे नाही. अराजकता पसरवणे हाच त्यांचा एकमेव अजेंडा आहे आणि या अजेंड्यावर ते काम करीत आहेत,” अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधींच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली.

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभेत केलेल्या भाषणात सीजेपीच्या आंदोलक विद्यार्थ्यांवर पॅलेट गन चालवा आणि त्यांचे रक्त सांडा, हे आदेश गृहमंत्री अमित शाह यांनी दिले, असा गंभीर आरोप केला होता तसेच त्यांनी नवे शिक्षणमंत्री प्रल्हाद जोशी यांच्यावर टीका केली होती.



यासंदर्भात प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मी राहुल गांधींचे भाषण ऐकले नाही. माझ्याकडे तेवढा वेळ नाही. कारण त्यांच्या भाषणामध्ये काहीच नसते, पण मी इतकेच सांगेन विरोधी पक्षनेत्याने आरोप जरूर करावेत, चुकीच्या गोष्टी असतील तर त्यावर नक्की टिपण्णी करावी, मात्र तुम्ही देशातल्या युवकांसाठी काय गोष्टी करता? त्यांच्याबाबत सकारात्मक तुम्ही काय बोललात? युवकांचे कल्याण होईल असे काय बोललात? दिवसभर खोटे आरोप करायचे, काहीही बोलायचे यामुळे देशाच्या युवकांना काही मिळणार नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशाच्या युवकांचा विचार केला आहे. त्यामुळे एक सक्षम विधेयक आता येत आहे. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर सुरक्षित परीक्षा पद्धती येईल आणि युवकांचे कल्याण होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सीजेपी आंदोलनादरम्यान दाखल झालेल्या गुन्ह्यांबाबत मुख्यमंत्री म्हणाले की, पोलिसांनी अत्यंत संयमाने परिस्थिती हाताळली. बहुतांश गुन्हे जमावबंदीचे उल्लंघन केल्याप्रकरणी दाखल झाले असून ते मागे घेण्याचे आदेश गृह विभाग आणि राज्याच्या पोलीस महासंचालकांना देण्यात आले आहेत.

## निवडक

### ‘पीओके’मध्ये निवडणुकीदरम्यान हिंसाचारात ३० नागरिकांचा मृत्यू

**रावलाकोट :** पाकिस्तानच्या बेकायदेशीर ताब्यातील काश्मीर (पीओके)मध्ये विधानसभा निवडणुकीच्या काळात गेल्या ४८ तासांत ३० जणांचा मृत्यू झाला असून पाकिस्तानी सैन्यानेच ही हत्या केल्याचा तसेच मृतदेह गायब करण्यात आल्याचा आरोप जॉइंट अवामी ॲक्शन कमिटीने केला आहे. या घटनेनंतर पाकिस्तानी दडपशाहीचा निषेध व्यक्त होत आहे.

### संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांना व्ही. शांताराम पुरस्कार

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारचा यंदाचा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांना जाहीर करण्यात आला आहे. अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते प्रसाद ओक यांना चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ लेखक सलीम खान यांना राज कपूर जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे, तर अभिनेत्री राणी मुखर्जीची राज कपूर विशेष योगदान पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

# दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी पनवेल महापालिकेचा मोठा निर्णय

## योजनांच्या अर्थसहाय्यात वाढ करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका दिव्यांग कल्याण विभागामार्फत दिव्यांग बांधवांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांच्या अर्थसहाय्यात वाढ करण्याचा प्रस्ताव नुकत्याच झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करण्यात आला. यामुळे दिव्यांगांना अधिक प्रभावी आर्थिक आधार मिळाला असून त्यांच्या स्वावलंबी जीवन जगण्यासाठी मोठी चालना मिळाली आहे.

मनपा दिव्यांग कल्याण विभागामार्फत सध्या उदरनिर्वाह व व्यवसायासाठी अर्थसहाय्य, दिव्यांग व्यक्तींच्या विवाहासाठी आर्थिक मदत, उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती तसेच अतितीव्र (बिछान्याला खिळलेल्या) दिव्यांगांना मासिक उदरनिर्वाह भत्ता अशा विविध योजना महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहेत. औषधोपचाराचा खर्च आणि जीवनावश्यक गरजांचा विचार करून या योजनांमधील आर्थिक सहाय्य वाढविण्याचा निर्णय महासभेत प्रस्तावित करण्यात आला होता. हा विषय मंजूर झाल्याने महापालिका कार्यक्षेत्रातील दिव्यांग बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



### उदरनिर्वाह व व्यवसायासाठी दुप्पट आर्थिक सहाय्य

महापालिका क्षेत्रातील सुमारे २,०२१ दिव्यांग लाभार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार उदरनिर्वाह, व्यवसाय किंवा आवश्यक साहित्य खरेदीसाठी थेट बँक खात्यात निधी जमा करण्याची योजना राबविण्यात येते. या योजनेत ४० ते ६० टक्के दिव्यांगत्व असलेल्या लाभार्थ्यांना वार्षिक १२ हजार रुपयांऐवजी २४ हजार रुपये, ६१ ते ८० टक्के दिव्यांगत्व असलेल्यांना १८ हजार रुपयांऐवजी ३६ हजार रुपये, तर ८१ ते १०० टक्के दिव्यांगत्व असलेल्या लाभार्थ्यांना २४ हजार रुपयांऐवजी ४८ हजार रुपये अर्थसहाय्य देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. या योजनेसाठी सुमारे ४.७७ कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

### विवाहासाठी अर्थसहाय्यात मोठी वाढ

दिव्यांग व्यक्तींच्या विवाहाला प्रोत्साहन आणि त्यांच्या सामाजिक पुनर्वसनाला चालना देण्यासाठी विवाह अर्थसहाय्य वाढविण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार एका व्यक्तीला दिव्यांगत्व असल्यास सध्या मिळणारे २५ हजार रुपये वाढवून ५० हजार रुपये, तर दोन्ही नवदाम्पत्य दिव्यांग असल्यास ४० हजार रुपयांऐवजी ८० हजार रुपये अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. (पान २ वर..)



पनवेल महानगरपालिका दिव्यांग बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने संवेदनशील, लोकाभिमुख आणि कल्याणकारी दृष्टिकोनातून कार्यरत आहे. उदरनिर्वाह, उच्च शिक्षण, विवाह तसेच अतितीव्र दिव्यांगांच्या मासिक उदरनिर्वाह भत्त्यामध्ये प्रस्तावित करण्यात आलेली वाढ ही केवळ आर्थिक मदत नसून दिव्यांग बांधवांना सन्मानाने, स्वाभिमानाने, स्वावलंबी आणि सक्षम जीवन जगण्यासाठी दिलेले बळ आहे. समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी आणि सन्मान मिळावा या भूमिकेतून महापालिका दिव्यांगांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी कटिबद्ध आहे.

**-नितीन पाटील,** महापौर, पनवेल महानगरपालिका



दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी पनवेल महापालिका नेहमीच प्राधान्य देत आली आहे. दिव्यांगांच्या वाढत्या गरजा, महागाई आणि वैद्यकीय खर्चाचा विचार करून विविध योजनांतील अर्थसहाय्य वाढविण्याचा प्रस्ताव महासभेत मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे दिव्यांग बांधवांना आर्थिक आधार मिळण्याबरोबरच त्यांच्या शिक्षण, रोजगार, पुनर्वसन आणि स्वावलंबनाला नवी दिशा मिळेल. दिव्यांग हिताला प्राधान्य देणारा हा महत्त्वपूर्ण निर्णय ठरेल.

**-प्रकाश बिनेदार,** सभागृहनेते, पनवेल महानगरपालिका

## संगीत विद्यार्थ्यांना विदुषी शुभदा पराडकर यांचे लाभणार मार्गदर्शन

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि नादब्रह्म साधना मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने संगीत क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी एक विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रातील ज्येष्ठ गायिका व विदुषी शुभदा पराडकर या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करणार आहेत.

संगीत क्षेत्रात करिअर करण्याची इच्छा असलेल्या तसेच शास्त्रीय संगीत, ठुमरी, दादरा, टप्पा आणि इतर संगीत प्रकारांमध्ये प्रगती करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. संगीताचा नियमित रियाज, सादरीकरणातील बारकावे, स्पर्धा व परीक्षांची तयारी, गुरू-शिष्य परंपरेचे महत्त्व तसेच संगीत क्षेत्रातील विविध करिअर संधी याविषयी विदुषी शुभदा पराडकर विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. हा मार्गदर्शनपर कार्यक्रम ५ ऑगस्ट रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ६ या वेळेत पनवेलमधील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला असून प्रवेश विनामूल्य आहे.



संगीत शिक्षण घेणारे विद्यार्थी, विविध संगीत परीक्षा देणारे विद्यार्थी, नवोदित गायक-गायिका, संगीत शिक्षक, पालक तसेच संगीतप्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून या अनोख्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा तसेच अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी रायगडभूषण पं.उमेश चौधरी (९३२४८२४२०५), विनोद तोडेकर (७०४५८२२५४८) किंवा अनिल कोळी (९७६९४०९१६१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## एसटीच्या स्मार्ट कार्डसाठी मुदतवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

एसटी प्रवासात मिळणाऱ्या सवलतींचा लाभ घेण्यासाठी लागू करण्यात आलेल्या एनसीएमसी स्मार्ट कार्डच्या सक्तीला आता १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यापूर्वी १ ऑगस्टपासून हे कार्ड अनिवार्य केले जाणार होते.

राज्य सरकारकडून अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, तर सामान्य ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना एसटी प्रवासात ५०% सवलत दिली जाते. या सवलतींमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आणि बनावटगिरी रोखण्यासाठी १ ऑगस्टपासून एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य केले जाणार होते, परंतु लाखो ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांची होणारी मोठी गैरसोय टाळण्यासाठी एसटी प्रशासनाने ही मुदत १ सप्टेंबरपर्यंत वाढवली आहे.

## सायबर क्राईमविरोधात रायगड पोलिसांची मोहीम

**अलिबाग : प्रतिनिधी**

वाढत्या सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी रायगड पोलिसांनी व्यापक मोहीम हाती घेतली आहे. फसवणूक आणि अफरातफरीसाठी वापरल्या जाणाऱ्या ‘म्यूल अकाऊंट्स’विरोधात पोलिसांनी कारवाईला सुरुवात केली असून गेल्या काही दिवसांत तब्बल २३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. वापरण्यात आलेल्या खात्यांच्या माध्यमातून ३५ कोटींची अफरातफर झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

देशभरात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. नवनवीन मार्ग आणि क्लुप्त्या शोधून लोकांच्या खात्यामधील रकमेचा अपहार केला जात आहे. या प्रकारांना आळा घालण्यासाठी रायगड पोलिसांनी मोठी मोहीम हाती घेतली आहे. सायबर फसवणुकीत वापरल्या जाणाऱ्या ‘म्यूल अकाउंट’धारकांविरोधात जिल्हाभर विशेष कारवाई सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेसाठी पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांनी पुढाकार घेतला आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकांची स्थापना करण्यात आली असून विविध पोलीस ठाण्यांतील अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग आहे.



सायबर गुन्हेगारांकडून बऱ्याचदा दुसऱ्यांच्या नावाने बँक खाते उघडून अफरातफर आणि फसवणुकीसाठी त्यांच्या बँक खात्यांचा वापर केला जातो. अशा खात्यांना म्यूल अकाऊंट असे संबोधले जाते. सायबर गुन्हेगार विविध आमिषे दाखवून नागरिकांकडून बँक खाती, एटीएम कार्ड, चेकबुक, सीमकार्ड आणि इतर आर्थिक साधनांचा गैरवापर करतात. त्यानंतर फसवणुकीची रक्कम ही म्यूल अकाऊंट्सच्या माध्यमातून वळवली जाते. ही बाब लक्षात घेऊन रायगड पोलिसांनी आता म्यूल खात्यांविरोधात व्यापक कारवाईला सुरुवात केली आहे.

रायगड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार २३ जुलैपर्यंत जिल्ह्यात तब्बल २३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात सायबर पोलीस ठाण्यातील १०, कर्जतमधील तीन, तर श्रीवर्धन, अलिबाग, नागोठणे, पोयनाड, रोहा, रसायनी, माणगाव, खोपोली, पेण, कोलाडमधील प्रत्येकी एका गुन्ह्याचा समावेश आहे. या गुन्ह्यातील म्यूल अकाऊंटमधून अपहार झालेली रक्कम ३५ कोटी ३० लाख ९७ हजार ७६६ इतकी असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

नागरिकांनी सायबर फसवणुकीबाबत सतर्क राहून संशयास्पद व्यवहारांची माहिती त्वरित पोलिसांना द्यावी, असे आवाहन रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी केले आहे.

### सूत्रधाराला अटक

पोलिसांनी सर्व म्यूल अकाऊंटधारकांच्या खात्यांची तपासणी सुरू केली असून बँकांकडून या खात्यांचे स्टेटमेंटही प्राप्त करून घेतले आहेत. त्या आधारे पुढील तपास सुरू केला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे सायबर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांमधील मुख्य सूत्रधारास पोलिसांनी अटक केली असून तो सध्या पोलीस कोठडीत आहे.

# ‘महायुती सरकारचे मराठा समाजासाठी सर्वाधिक काम’

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकार मराठा समाजाच्या हितासाठी आणि कल्याणासाठी सातत्याने काम करत असून महायुती सरकारने आतापर्यंत घेतलेल्या निर्णयांची संख्या आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यापूर्वी कोणत्याही सरकारने केली नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि. २९) स्पष्ट केले. काही शंका किंवा न्याय मिळत नसल्याची भावना असल्यास संवादातून मार्ग काढण्यास सरकार तयार असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी २९ ऑगस्टपासून पुन्हा आंदोलनाचा इशारा दिला आहे. राज्यात सापडलेल्या ५८ लाख कुणबी नोंदींच्या आधारे मराठा समाजाला प्रमाणपत्रे दिली जात नसल्याचा आरोप त्यांनी केला होता. यावर स्पष्टीकरण देताना



मुख्यमंत्री म्हणाले की, ज्यांनी नियमानुसार जात प्रमाणपत्रासाठी अर्ज केले आहेत, त्या बहुतांश नागरिकांना प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. सध्या यासंदर्भातील प्रलंबित प्रकरणांची संख्या अत्यंत कमी आहे. तरीही काही पात्र व्यक्ती वंचित राहिल्याचे वाटत असल्यास सरकार त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून प्रश्न सोडवण्यास कटिबद्ध आहे.

नीट पेपरफुटीच्या मुद्द्यावर मुंबईसह राज्यात झालेल्या आंदोलनादरम्यान महाराष्ट्र पोलिसांनी संयमाची भूमिका घेतली होती. या काळात विद्यार्थ्यांवर प्रामुख्याने जमावबंदीचे जे गुन्हे दाखल झाले आहेत, ते सर्व गुन्हे मागे घेण्याचे स्पष्ट आदेश पोलीस आणि गृह विभागाला देण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. एक रुपयात पीक विमा योजनेतील लाभार्थ्यांची संख्या कमी झाल्याच्या तक्रारींवर बोलताना ते म्हणाले की, एक रुपयात पीक विमा उपलब्ध करून दिल्यानंतर मोठ्या प्रमाणावर बोगस अर्ज दाखल झाले होते. या गैरप्रकारांवर कठोर कारवाई केल्यामुळे आता पात्र शेतकऱ्यांनाच लाभ मिळत असून लाभार्थ्यांची संख्या नैसर्गिकरीत्या नियंत्रित झाली आहे.

दरम्यान, गडचिरोलीत नक्षलवाद्यांच्या नावाने झळकलेल्या बॅनरबाबत बोलताना मुख्यमंत्र्यांनी काही स्वार्थी तत्त्वांनी स्वतःच्या फायद्यासाठी ही पत्रके लावली असल्याचे सांगून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा दिला.

# वीर जवान फाउंडेशनचा वाशी येथे भव्य सन्मान सोहळा

## कारगिलच्या १४ वीरांगनांना प्रत्येकी ५० हजारांचे सहाय्य

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शूर जवानांच्या त्यागाला सलाम करत वीर जवान फाउंडेशनतर्फे वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात रविवारी कारगिल विजय दिनानिमित्त "शौर्य, सन्मान आणि राष्ट्रभक्ती" या संकल्पनेवर आधारित भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाने उपस्थितांच्या मनात देशभक्ती आणि अभिमानाची भावना जागवली.




कार्यक्रमाला पद्मश्री पार्श्वगायक शंकर महादेवन, अतिरिक्त आयुक्त समीर वानखेडे, एनएसजी ब्लॅक कॅट कमांडो कर्नल अभिषेक कुमार, मेजर इंद्रजीत सिंह, कर्नल रानडे, वीर जवान फाउंडेशनचे संस्थापक विजय नाहटा, अभिनेते केतन करांडे, शौर्यचक्र विजेते मधुसूदन सुर्वे, वीर जवान फाउंडेशनचे अध्यक्ष सुरेश काकडे तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर, वीरांगना, वीरमाता, एनसीसी कॅडेट्स आणि मोठ्या संख्येने देशप्रेमी नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचा सर्वात भावनिक आणि प्रेरणादायी क्षण म्हणजे १४ वीरांगनांचा विशेष सन्मान. कारगिलसह विविध मोहिमांमध्ये सर्वोच्च बलिदान दिलेल्या जवानांच्या पत्नी असलेल्या या वीरांगनांना प्रत्येकी ५० हजार रुपये आर्थिक मदत देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान केवळ आर्थिक मदत नसून संपूर्ण राष्ट्राच्या वतीने त्यांच्या त्यागाबद्दल व्यक्त केलेली कृतज्ञता आणि आदराचे प्रतीक ठरला.

यावेळी पद्मश्री शंकर महादेवन यांनी आपल्या राष्ट्रभक्तीच्या ओतप्रोत गीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या सादरीकरणाने संपूर्ण नाट्यगृह देशभक्तीच्या भावाने भरून गेले. अनेक वीरांगना, वीरमाता आणि नागरिकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवर, स्वयंसेवक, एनसीसी कॅडेट्स, प्रायोजक आणि सामाजिक संस्थांचे वीर जवान फाउंडेशनचे अध्यक्ष सुरेश काकडे यांनी आभार मानले.

# उधार का उजाला कवितासंग्रहाचे आज मुंबईत होणार प्रकाशन

**मुंबई : प्रतिनिधी**

सदामंगल पब्लिकेशन प्रकाशित आणि कवयित्री प्रज्ञा जांभेकर लिखित ‘उधार का उजाला’ या हिंदी कवितासंग्रहाचा प्रकाशन समारंभ गुरुवारी (दि.३०) सायंकाळी ६.३० वाजता प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिराच्या मिनी थिएटरमध्ये होणार आहे. प्रकाशक आणि पत्रकार संदीप चव्हाण यांनी ही माहिती दिली.

या प्रकाशन सोहळयाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार, विचारवंत आणि साहित्यिक विनय हर्डीकर असतील. ज्येष्ठ कवी आणि अभिनेते किशोर कदम तसेच महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभाग आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव व ज्येष्ठ सनदी अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. ‘उधार का उजाला’ कवितासंग्रहाच्या प्रकाशनानिमित्ताने काव्यरसिकांसाठी विशेष काव्य अभिवाचनाचेही आयोजन करण्यात आले आहे. सुनील कांबळे, राजेश शिरभाते आणि सानिका गोडसे हे पुस्तकातील निवडक कवितांचे अभिवाचन करणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र हुंजे करणार आहेत. सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन सदामंगल पब्लिकेशनतर्फे करण्यात आले आहे.

# तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे गुरुपौर्णिमा उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रम विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर प्रा. किशोर पाटील यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व स्पष्ट करताना गुरू हे ज्ञान, संस्कार आणि जीवनाला योग्य दिशा देणारे मार्गदर्शक असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुंबद्दल




सदैव आदर व कृतज्ञतेची भावना जपावी, असा संदेश त्यांनी दिला.

विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका संगीता थोरात यांनी विद्यार्थी आणि गुरु यांचे नाते उलगडून सांगत गुरुंच्या मार्गदर्शनामुळे जीवन यशस्वी व अर्थपूर्ण बनते, असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमास ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबूलाल पाटोळे, विज्ञान विभागप्रमुख प्रा. झुंजार माने, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. ऋषिकेश धुरी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# पनवेलमधील स्वामी समर्थ मठ येथे गुरुपौर्णिमा उत्सव भक्तिमय वातावरणात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील गावदेवी पाडा परिसरातील श्री स्वामी समर्थ मठ येथे गुरुपौर्णिमा उत्सव अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात संपन्न झाला. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पनवेलसह परिसरातील मोठ्या संख्येने स्वामीभक्तांनी उपस्थित राहून श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेत गुरुचरणी कृतज्ञता व्यक्त केली.

उत्सवानिमित्त पहाटे ५ वाजल्यापासून श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पूजनाने कार्यक्रमास प्रारंभ झाला. त्यानंतर आरती, नामस्मरण,



प्रवचन तसेच विविध धार्मिक विधी भक्तिभावाने पार पडले. दिवसभर मठ परिसरात 'श्री स्वामी समर्थ' नामाचा अखंड गजर घुमत राहिला आणि संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

या सोहळयास गुरुवर्य मठाधीपती परमपूज्य श्री श्री १०८ श्री महंत सुधाकरदासजी महाराज यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी गुरुपरंपरेचे महत्त्व विशद करत भक्तांना अध्यात्म, सेवा आणि सदाचाराचा संदेश दिला. सायंकाळी आगरी समाज हॉल, पनवेल येथे आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रमात शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरण होते.

या गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन अवधूत सुधाकर घरत आणि स्वामी समर्थ भक्त मंडळ, पनवेल यांच्या वतीने करण्यात आले. उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळाचे पदाधिकारी, स्वयंसेवक आणि सेवेकऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थित भाविकांनी श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेऊन आशीर्वाद प्राप्त करत गुरुपौर्णिमेचा पवित्र उत्सव भक्तिभावाने साजरा केला.

# लायन्स क्लबतर्फे शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचा सन्मान

**पनवेल : वार्ताहर**

गुरुपौर्णिमेचे औचित्य साधत लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम यांच्या वतीने रोटरी संचालित विशेष मुलांच्या शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांचा सन्मान करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. शिक्षकांच्या कार्याचा गौरव करणारा हा उपक्रम अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

यावेळी शाळेतील शिक्षक आणि कर्मचारी वर्गाला सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या सन्मानपत्रामध्ये गुरुंचे महत्त्व अधोरेखित करणारी मानदा पंडित यांनी लिहिलेली सुंदर कविता समाविष्ट करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरगम क्लबचे अध्यक्ष आदित्य दोशी होते. व्यासपीठावर शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका शैला बंदसोडे, सरगम क्लबच्या सचिव मानदा पंडित तसेच प्रोजेक्ट चेअरमन स्वाती गोडसे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वरिष्ठ शिक्षिका अरुंधती बंदसोडे यांनी केले. अध्यक्ष आदित्य दोशी यांनी गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने




शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत सरगम क्लबच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. तसेच भविष्यात विशेष मुलांचे विद्यार्थी आणि शाळेतील कर्मचारी यांच्यासाठी विविध उपयुक्त उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला. प्रभारी मुख्याध्यापिका शैला बंदसोडे यांनी सरगम लायन्स क्लबने केलेल्या या आगळ्यावेगळ्या सत्काराबद्दल मनःपूर्वक आभार मानले. या हृद्य सन्मानामुळे शिक्षक आणि कर्मचारी भावूक झाले असून सन्मानित शिक्षकांनीही आपल्या भावना व्यक्त करत क्लबचे कौतुक केले.

प्रोजेक्ट चेअरमन स्वाती गोडसे यांनी हा सन्मान सोहळा आयोजित करण्याची संधी दिल्याबद्दल शाळेचे शिक्षक, कर्मचारी आणि शालेय समितीचे आभार मानले. याप्रसंगी सरगम क्लबच्या वतीने विशेष मुलांना बिस्किटांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास सरगम क्लबचे संजय गोडसे, प्रेमेंद्र बहिरा, सुनील देशपांडे, संध्या महानुभाव, दीपेश नवधरे तसेच रोटरी विशेष मुलांच्या शाळेतील शिक्षक, कर्मचारी आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरुन

## न्हावाशेवा टप्पा ३ पाणीपुरवठा योजनेसंदर्भात मंत्री गुलाबराव पाटील यांच्यासोबत बैठक

राज्य शासन नागरिकांना गुणवत्तापूर्ण व नियोजनबद्ध पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले तसेच वाढत्या लोकसंख्येची पाण्याची गरज भागवण्यासाठी या योजनेतील सर्व प्रलंबित कामे ठरवून दिलेल्या मुदतीत आणि उच्च दर्जा राखून पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

## दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी पनवेल महापालिकेचा मोठा निर्णय

### उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दुप्पट

वैद्यकीय, अभियांत्रिकी, पीएचडी आणि एमबीए यांसारख्या पूर्ण वेळ व्यावसायिक व पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या गुणवत्ता प्राप्त दिव्यांग विद्यार्थ्यांना एकरकमी २५ हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जात होती. ही रक्कम वाढवून ५० हजार रुपये करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी अधिक आर्थिक पाठबळ मिळणार आहे.

### अतितीव्र दिव्यांगांसाठी मासिक उदरनिर्वाह भत्ता वाढणार

बिछान्याला खिळलेल्या अतितीव्र दिव्यांगांना दरमहा तीन हजार रुपये उदरनिर्वाह भत्ता दिला जात होता. वाढत्या वैद्यकीय खर्चाचा विचार करून हा भत्ता वाढवून दरमहा सहा हजार रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे औषधोपचार व दैनंदिन वैद्यकीय खर्चासाठी मोठा दिलासा मिळाला आहे. महापालिकेच्या दिव्यांग कल्याण विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या चारही योजनांच्या अर्थसहाय्यात वाढ झाल्याने दिव्यांग बांधवांना आर्थिक स्थैर्य, स्वावलंबन आणि सन्मानाने जीवन जगण्यासाठी आवश्यक बळ मिळणार असल्याचा विश्वास दिव्यांग विभाग उपायुक्त रविकिरण घोडके यांनी व्यक्त केला आहे.

# सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेला मुदतवाढ

**अलिबाग : जिमाका**

राज्यात उत्पादनावर आधारित सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप २०२६ व रब्बी हंगाम २०२६-२७ या एक वर्षाकरिता अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक धरून राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यासाठी इफको टोकिओ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, पुणे यांची एक वर्षासाठी निवड करण्यात आली आहे. ही योजना कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक असून योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत ३१ जुलै आहे. म्हणजे पीक विमा अर्ज करण्यासाठी शेवटचे दोन दिवस राहिलेले आहेत. अधिसूचित पिकांसाठी खातेदारांच्या व्यतिरिक्त कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत पात्र आहेत. यावर्षी ही योजना राबवताना ई-पीक पाहणी म्हणजेच लागवड केलेल्या पिकाची नोंदणी डिजिटल क्रॉप सर्वे या ॲपवर करणे बंधनकारक केले आहे. तसेच शेतकरी ओळखपत्र क्रमांक ही बंधनकारक करण्यात आला आहे. ई-पीक पाहणी आणि प्रत्यक्ष काढलेला विमा यामध्ये तफावत आढळल्यास विमा कोणत्याही पातळीवर रद्द करण्यात येणार आहे व विमा हप्ता रक्कम जप्त करण्यात येईल.

शेतकरी ओळखपत्र क्रमांक बंधनकारक असल्याने केवळ लागवडीखाली असलेल्या अधिसूचित पिकांचाच विमा काढता येईल यावर्षीच्या योजनेत एक रुपयात विमा हप्ता मिळणार नाही अधिसूचित पिकांसाठी हा हप्ता २% आहे मात्र विमा कंपन्यांनी संभाव्य नुकसान भरपाईचा धोका लक्षात घेऊन विमा हप्ता कमी केला आहे. त्यामुळे जिल्ह्यात भात पिकासाठी प्रती हेक्टरी ६५० रु व नाचणी पिकासाठी प्रती हेक्टरी ४०० रु. इतका विमा हप्ता रायगड जिल्ह्यासाठी आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज, आधारकार्ड, अधिसूचित पिकाचे पेरणी केलेले स्वयंघोषणापत्र, भाडेपट्टा करार असलेल्या शेतकऱ्यांचा करारनामा, संमती पत्र, बँक पासबुक प्रत इत्यादी कागदपत्र आवश्यक आहेत. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

# कॅप्टन विठ्ठलराव कदम सैनिकरत्न पुरस्काराने सन्मानित



**चौक : प्रतिनिधी**

कॅप्टन विठ्ठलराव नारायणराव कदम यांना देशभक्ती, देशसेवा या कार्यासाठी सैनिक फेडरेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सैनिक रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. वयाची ९० वर्षे पूर्ण झालेले कॅप्टन विठ्ठलराव नारायणराव कदम यांनी भारतीय लष्कराचे आभार व्यक्त केले.

कॅप्टन विठ्ठलराव नारायणराव कदम यांनी देशसेवेत दाखल झाल्यावर सर्व प्रथम गोवा मुक्ती मोहिमेत भाग घेतला. सन १९६२ चीन युद्ध, १९६५ पाकिस्तान युद्ध, १९७१ बांगला देश युद्ध अशा तीन युद्धात सहभागी होऊन १९८४ साली पंजाब येथे सुवर्ण मंदिरात ब्लू स्टार ऑपरेशनमधील त्यांची कामगिरी श्रेष्ठ होती. ३२ वर्षे लष्करात सेवा करून निवृत्त झाले. भारतीय सैन्यातून सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनी कोयना प्रकल्पग्रस्त वावंढळ गावच्या पुनर्वसन कामात लक्ष घातले. गावच्या सार्वजनिक जमिनीत ते प्रतिनिधी म्हणून काम केले. महाराष्ट्र राज्य सरकारने त्यांना विशेष कार्यकारी अधिकारी हे पद दिले.

त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून ग्राम पंचायत वावंढळ यांनीही त्यांना गौरविले आहे. सामाजिक कार्याची दखल घेऊन कोयना क्षत्रिय मराठा समाज सेवा संघ यांच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार देऊन त्यांचा येथोचित सन्मान करण्यात आला आहे. अनेक सामाजिक संस्था, कार्यकर्ते आणि सेवा निवृत्त संघटना यांनी त्यांचा सन्मान केला आहे. त्यांच्या देशसेवा, सामाजिक कार्य या कार्याचा गौरव म्हणून सैनिक फेडरेशन यांनी त्यांना सैनिक रत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला आहे.

# भाजप उरण तालुका उपाध्यक्ष प्रकाश ठाकूर यांचे निधन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

भाजपचे उरण तालुका उपाध्यक्ष, धुतूम ग्रामपंचायत सदस्य, उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते प्रकाश काशिनाथ ठाकूर उर्फ पी. के. ठाकूर (५३) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या आकस्मिक निधनाने धुतूम गावासह राजकीय, सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे. उरणचे आमदार महेश बालदी यांचे ते खंदे समर्थक होते.



ग्रामीण भागात भाजपच्या संघटनात्मक बांधणी आणि पक्षविस्तारासाठी त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले होते. सर्वसामान्यांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या संबंधांमुळे त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये आगळीवेगळी ओळख निर्माण केली होती. धुतूम येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आमदार महेश बालदी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, व्यावसायिक, ग्रामस्थ आणि हजारो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांना अखेरचा निरोप दिला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले आणि मोठा आप्तपरिवार आहे.

# गुरु साक्षात परब्रम्ह! पनवेलमध्ये गुरुपौर्णिमेचा उत्साह

**पनवेल : वार्ताहर**



पनवेल येथील स्टेशन रोडवरील श्री साई नारायणबाबा आश्रम आणि श्री साईबाबा मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सव बुधवारी अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. परमपूज्य सद्गुरू श्री साई नारायणबाबा यांच्या पावन सान्निध्यात झालेल्या या सोहळ्यास पनवेलसह राज्यातील विविध भागांतून आलेल्या साईभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

सकाळी अभिषेकाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर मंत्रोपदेश, महाचरण पूजा, सामूहिक प्रार्थना आणि विविध धार्मिक विधी भक्तिमय वातावरणात पार पडले. गुरुपौर्णिमेनिमित्त भाविकांनी सद्गुरूंच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करीत आशीर्वाद घेतले. उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. तसेच आश्रमात आलेल्या प्रत्येक साईभक्ताला आयोजकांच्या वतीने 'साईरक्षा' भेट देण्यात आली. दिवसभर आश्रम परिसरात भक्तिरस ओसंडून वाहत होता.

दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री साई नारायणबाबा आश्रमातील गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

## 'सीकेटी'त आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांची लाभली उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित प्रमुख अतिथी व मान्यवरांच्या हस्ते व्यासमुनींच्या प्रतिमेचे पूजन झाले.

मुख्याध्यापक सुभाष मानकर यांनी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी शिवचरित्रकार, कीर्तनकार हभप संतोष राम सते महाराज यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ तसेच इतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सहा. शिक्षक प्रदीप देशमुख यांनी मुख्याध्यापकांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांनी शिक्षकवृंद यांना गुलाबपुष्प व भेटवस्तू देऊन कृतज्ञता व्यक्त केली.




कार्यक्रमादरम्यान शालांतर्गत झालेल्या विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी श्लोक, गुरु-शिष्यांच्या गोष्टी, नृत्य सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. या कार्यक्रमासाठी आध्यात्मिक क्षेत्रातील नामवंत शिवचरित्रकार, कीर्तनकार हभप संतोष राम सते महाराज, पखवाजवादक हभप ओंकार पाटील, गायनाचार्य हभप रोहन तावडे, हभप विनोद सिंग, हभप राम सते ही संतमंडळी तसेच विभागप्रमुख प्राचार्य प्रशांत मोरे, मुख्याध्यापक कैलास म्हात्रे, निलीमा शिंदे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, हरिश्चंद्र ठाकूर, वैशाली पारधी, पालक-शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा रेश्मा खुटाळ, सहसचिव माधुरी काळे यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या शेवटी हभप संतोष महाराज सते यांनी विद्यार्थ्यांना आपल्या मनोगतातून जीवनात शिक्षकांचे महत्त्व, गुरूंचे महत्त्व याबद्दल बहुमोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे निवेदक सहा. शिक्षक पंढरीनाथ जाधव यांनी मान्यवरांचे शब्दसुमनाने आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

---

## सीकेटी प्राथमिक इंग्रजी माध्यमात गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुवंदना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयाच्या प्राथमिक इंग्रजी माध्यम विभागातील विद्यार्थ्यांच्या वतीने गुरु-शिष्य परंपरा जपत अनोख्या गुरुवंदनेने गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या संचालिका वर्षा ठाकूर आणि संचालक राहुल घरत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी वर्षा ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना ज्ञान, शिस्त, प्रामाणिकपणा व सदाचाराचे महत्त्व पटवून दिले, तर मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी गुरू हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला दिशा देणारे शिल्पकार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात मास्टरमाईंड, इंग्लिश मॅरेथॉन, ऑलिम्पियाड, मंथन स्कॉलरशिप, महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा आणि राष्ट्रीय किक बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. वर्षा ठाकूर यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल मुख्याध्यापिका व शिक्षकांचे कौतुक केले. या सोहळ्यास पालक संघाच्या व्हाईस प्रेसिडेंट विजयलक्ष्मी दास, मुख्याध्यापिका स्वाती काळे, मुख्याध्यापक सुभाष मानकर, पर्यवेक्षिका नीरजा अधुरी आणि वैशाली पारधी उपस्थित होत्या.




## श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या द्रोणागिरी विभागातील श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालयात गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये वकृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा तसेच क्विझ कॉम्पिटिशन ठेवण्यात आल्या. वेगवेगळ्या वयोगटातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. अनेकांनी गुरुंबद्दल कविता सादर केल्या. या कार्यक्रमानिमित्त जितेंद्र घरत, गोपीनाथ म्हात्रे, सीमा घरत, सुनील पाटील, जीवन गावंड, भगवान म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त केले तसेच विद्यार्थ्यांच्या समवेत मान्यवरांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

## एमएनएम विद्यालयात शैक्षणिक, सांस्कृतिक आणि मूल्यवर्धक उपक्रमांची गुरुपौर्णिमा

**गव्हाण** : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एमएनएम व टीएनजी कनिष्ठ विज्ञान विद्यालय, गव्हाण-कोपर येथे गुरुपौर्णिमा विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि मूल्यवर्धक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात विशेष प्रार्थना सभेने झाली. विद्यार्थ्यांनी गुरुंचे महत्त्व, भारतीय संस्कृतीतील गुरु-शिष्य परंपरा आणि शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करणारी मनोगते, भाषणे, सुविचार व गीतांच्या माध्यमातून उपस्थितांची मने जिंकली.




यानिमित्त पूर्व प्राथमिक विभागासाठी कलावंत स्पर्धा, इयत्ता पहिली व दुसरीसाठी रंगभरण स्पर्धा, इयत्ता तिसरी व चौथीसाठी शिक्षक गौरव भाषण स्पर्धा, इयत्ता पाचवी ते सातवीसाठी गिफ्ट रॅपिंग स्पर्धा तसेच इयत्ता आठवी ते बारावीसाठी उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांचे आणि वक्तृत्व कौशल्याचे उत्कृष्ट सादरीकरण केले.

या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये गुरुजनांविषयी आदर, कृतज्ञता, संस्कार आणि भारतीय परंपरेची जाणीव अधिक दृढ झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या प्रभारी प्राचार्या सायली वडवलकर, पर्यवेक्षक व पर्यवेक्षिका यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडले. त्यांनी विद्यार्थ्यांना गुरुंचा सन्मान, ज्ञानाची कास आणि संस्कारमूल्ये जपण्याचा संदेश दिला.

---

## इनरव्हील क्लब ऑफ पनवेलची देदीप्यमान कामगिरी







### तब्बल १० बक्षिसांचा मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नुकतीच पुणे येथे इनरव्हील डिस्ट्रिक्ट ३१३ची वार्षिक डिस्ट्रिक्ट असेंब्ली मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात पार पडली. या सोहळ्यात सन २०२६-२७ वर्षासाठी डिस्ट्रिक्ट चेअरमन म्हणून डॉ. दीपशिखा पाठक यांच्या पदग्रहणाचा समारंभ संपन्न झाला. राज्यभरातील इनरव्हील क्लबच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात गतवर्षी उल्लेखनीय सामाजिक कार्य करणाऱ्या क्लबांचा गौरव करण्यात आला. यामध्ये इनरव्हील क्लब ऑफ पनवेलने आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर तब्बल १० बक्षिसे पटकावत विशेष मान मिळविला.

सन २०२५-२६ या वर्षभरात शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन, सामाजिक जनजागृती तसेच गरजू घटकांसाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविल्याबद्दल इनरव्हील क्लब ऑफ पनवेलला विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. क्लबच्या अध्यक्ष शुभांगी शिरीष पिंपळकर आणि सचिव डॉ. अमृता सुमुख नाईक यांना त्यांच्या उत्कृष्ट नियोजन, प्रभावी नेतृत्व आणि वर्षभरातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'बेस्ट प्रेसिडेंट-सेक्रेटरी जोडी' हे प्रतिष्ठेचे पारितोषिक प्रदान करण्यात आले तसेच क्लबच्या एडिटर वर्षा प्रशांत ठाकूर यांना प्रभावी कार्याबद्दल 'बेस्ट एडिटर' पारितोषिकाने गौरविण्यात आले.

क्लबने राबविलेल्या 'हॅपी स्कूल' या महत्त्वपूर्ण उपक्रमाचीही विशेष दखल घेण्यात आली. या उपक्रमासाठी अध्यक्षा शुभांगी पिंपळकर यांना विशेष पदक प्रदान करण्यात आले. शिक्षण क्षेत्रातील सकारात्मक योगदान आणि विद्यार्थ्यांसाठी निर्माण करण्यात आलेल्या सुविधांमुळे हा उपक्रम जिल्हा स्तरावर विशेष ठरला. याशिवाय वर्षभर विविध समाजोपयोगी प्रकल्प यशस्वीपणे राबविल्याबद्दल इनरव्हील क्लब ऑफ पनवेलला विशेष ट्रॉफी प्रदान करण्यात आली. गत वर्षभरात केलेल्या विविध उपक्रमांची प्रशंसा म्हणून क्लबच्या पदाधिकारी व सदस्यांना अनेक प्रशस्तीपत्रे आणि सन्मानचिन्हेही देण्यात आली.

एकूण १० पुरस्कार प्राप्त करून इनरव्हील क्लब ऑफ पनवेलने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. क्लबच्या या यशामुळे सर्व पदाधिकारी आणि सदस्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून आगामी वर्षातही अधिक व्यापक स्वरूपात समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या उल्लेखनीय यशाबद्दल इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या सर्व पदाधिकारी आणि सदस्यांवर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



पनवेल : भाजप महिला मोर्चा पनवेल शहर चिटणीस सपना पाटील यांना बुधवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी नगरसेविका दर्शना भोईर, प्रतिभा भोईर, भाजप महिला मोर्चाच्या लीना पाटील, कविता पाटील, अरुणा पाटील आदी उपस्थित होत्या.











**पनवेल : गुरुपौर्णिमेनिमित्त भाजप पदाधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांना शुभेच्छा दिल्या.**

## तरुणी बेपत्ता

**पनवेल** : राहत्या घरातून बाहेर पडलेली एक तरुणी घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. कु.नाजमा अलीम खलिफा (१९, रा.अजिवली, ता. पनवेल), रंग सावळा, उंची सुमारे ४ फूट २ इंच, डाव्या नाकात नथ, केस काळे, लांब वेणी घातलेले, डोळे काळे, बांधा सडपातळ, अंगात पिवळ्या रंगाची सलवार व कमीज, तिला हिंदी व मराठी भाषा अवगत आहे. या तरुणीबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा तपास अधिकारी उपनिरीक्षक गणेश मोकाशी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.



पनवेल : छायाचित्रकार बाळू जुमलेदार यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेत त्यांचे आशीर्वाद घेतले.

## संपादकीय

# शिव्यांचे समर्थन चुकीचे

सरकारच्या धोरणांवर टीका करणे हा लोकशाहीचा भाग आहे. सरकार व सत्ताधारी पक्षाच्या धोरणांविषयी मतभेद असू शकतात, परंतु टीका आणि व्यक्तिगत अवमान यांच्यातील सीमारेषा पुसली जाणार नाही याचे भान पाळले जायलाच हवे. लोकशाहीने दिलेला आंदोलनाचा अधिकार हा सभ्यता व लोकशाही मूल्यांच्या चौकटीतच वापरला गेला पाहिजे.

**कॉक्रोच जनता पार्टीने दिल्लीतील जंतरमंतर येथे अलीकडेच केलेल्या आंदोलनादरम्यान काही तरुण आंदोलकांकडून, विशेषतः सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या काही व्हिडीओंमध्ये, पंतप्रधानांविषयी तसेच सार्वजनिक जीवनातील व्यक्तींविषयी अत्यंत अश्लील आणि शिवराळ भाषेचा वापर झाल्याने देशभरात त्यावर टीकात्मक प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविकच आहे. लोकशाहीमध्ये आंदोलन हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. सरकारच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणे, आपल्या मागण्या मांडणे आणि सरकारकडून उत्तरदायित्वाची अपेक्षा ठेवणे यात काहीच गैर नाही, परंतु निषेध व्यक्त करताना विशेषतः तरुण पिढीची भाषेची पातळी खालावल्यास तो निश्चितच अवघ्या देशातील समाजासाठी चिंतेचा विषय ठरतो. नेमके तेच आता घडताना दिसते आहे. आंदोलनातून उपस्थित केल्या गेलेल्या मूळ प्रश्नांपेक्षा तरुणांनी व विशेषतः तरुणींनी मर्यादा सोडून वापरलेल्या टोकाच्या शिवराळ भाषेवरच सध्या जिथे तिथे वाद रंगताना दिसतो आहे. या मुद्यावर शिक्षण क्षेत्रातील व्यक्ती, अनेक नामवंत डॉक्टर आणि विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित नागरिकांकडूनही नाराजी व्यक्त केली जाते आहे. कोणत्याही विचारसरणीशी असहमती असली तरी सभ्यतेचे किमान निकष पाळून व सुसंस्कृत पद्धतीनेच संवाद साधला जावा ही लोकशाहीची मूलभूत अपेक्षा असते. वैचारिक संघर्ष हा शब्दांच्या संयमातूनही प्रभावीपणे करता येतो. शिवराळपणा हा निषेधाच्या अभिव्यक्तीचा पर्याय असू शकत नाही असेच मत ही नामवंत मंडळी व्यक्त करत आहेत. भारतीय जनता पक्षाच्या खासदार आणि अभिनेत्री कंगना रणौत यांनीही या आंदोलनातील तरुण-तरुणींची प्रत्यक्षातील व समाजमाध्यमांतील व्हिडीओ व रील्समधील भाषा यांवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. आंदोलकांच्या भाषेबद्दल तसेच सार्वजनिक वर्तनाबद्दल त्यांनी प्रश्न उपस्थित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेकदा सार्वजनिक संवादात सभ्यता आणि लोकशाही मूल्यांचे पालन करण्यावर भर दिला आहे. राजकीय मतभेद असले तरी संस्थांचा आणि घटनात्मक पदांचा मान राखणे ही भारतीय लोकशाहीची परंपरा आहे. व्यक्तीवर टीका करता येते, परंतु देशाच्या सर्वोच्च लोकप्रतिनिधीच्या पदाचा अवमान करणारी भाषा कुणाही सुजाण व्यक्तीला निषेधार्हच वाटेल. अर्थात काही तरुणतरुणींनी वापरलेल्या आक्षेपार्ह भाषेवरून संपूर्ण 'जनरेशन Z'ला दोषी ठरवणेही योग्य नाही. या पिढीतील असंख्य तरुण आज निरनिराळ्या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. त्यामुळे काहींच्या वर्तनाचा ठपका संपूर्ण पिढीवर ठेवणे अन्यायकारक आहे हे मान्य, मात्र अशा मर्यादा ओलांडणाऱ्या आवाजांना सोशल मीडियावर अधिक प्रसिद्धी मिळत असेल तर त्याचा निषेध हा व्हायलाच हवा. आजवर निरनिराळ्या लोकशाही देशांमध्ये सुसंस्कृत व वैचारिकतेवर आधारित आंदोलनांनीच समाजपरिवर्तन घडवले आहे हे आपल्या देशातील तरुणतरुणींनी लक्षात घेतले पाहिजे व सुयोग्य मुद्यांवरच आपली ऊर्जा त्यांनी केंद्रित केली पाहिजे. तरच त्यांच्या मागण्यांना देशभरातील जनतेचा व्यापक पाठिंबा मिळू शकेल. शिवराळ भाषेतून उलट मूळ मुद्दे बाजूलाच राहतील. मतभेद व्यक्त करण्याची भाषा ही त्या लोकशाहीची खरी ओळख असते. त्यामुळेच लोकशाहीतील कुठल्याही आंदोलनाचा आवाज बुलंद असण्यासोबतच जबाबदारही असायला हवा.**

# महाआरोग्य शिबिर एक वरदान

आरोग्यम धनसंपदा, असे सुभाषित असले, तरी प्रत्यक्षात आरोग्याकडे दुर्लक्ष हा बहुतांश जणांचा स्थायीभाव असतो. अनेकजण 'काय होते', म्हणून आपल्या आरोग्याकडे लक्ष देत नाहीत, तर पैशांअभावी योग्य उपचार मिळू न शकणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे नागपूर येथे आयोजित करण्यात आलेले 'महाआरोग्य शिबिर' हे रुग्णांसाठी एक वरदान ठरले आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून सूत्रे स्वीकारल्यानंतर ज्या क्षेत्रांमध्ये त्यांनी विशेष लक्ष देण्याचा संकल्प केला, त्यात आरोग्य क्षेत्र एक प्रमुख आहे. गरिबातल्या गरीब माणसाला आरोग्य सुविधा कशा सहज मिळू शकतील, यादृष्टीने त्यांनी केलेल्या प्रयत्नांना यश येऊ लागले आहे. त्यासाठी त्यांनी रुग्णालयांची संख्या वाढविली आणि अस्तित्वात असलेली रुग्णालये अत्याधुनिक केली. दुर्गम भागातील गरीब आदिवासी बांधव उपचारांसाठी मोठ्या शहरांपर्यंत पोहचू शकत नाहीत, म्हणून मग रुग्णालयेच त्यांच्या परिसरात उभारली. गडचिरोली जिल्ह्यातील अहेरीत अलीकडेच झालेले स्वतंत्र महिला रुग्णालय हे त्याचेच उत्तम उदाहरण आहे.

नागपूर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) आणि इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो) यांचा कायापालट करून विदर्भच नव्हे तर शेजारील छत्तीसगड, मध्यप्रदेश, तेलंगणा, आंध्रप्रदेश येथील रुग्णांनाही अत्याधुनिक आरोग्य सुविधा मिळण्याची सोय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. या साऱ्या उपाययोजनांसोबतच आरोग्याच्या क्षेत्रात आणखी काय-काय करता येईल या दृष्टीने शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. रविवार, २६ जुलै २०२६ रोजी नागपुरात झालेले महाआरोग्य शिबिर हा त्या प्रयत्नांचाच एक भाग होता.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या महाआरोग्य शिबिरामुळे आरोग्याच्या सर्व सुविधा एकाच छताखाली रुग्णांना मिळाल्या. त्याआधी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त ५ ते १५ जुलै या काळात मुख्यमंत्री सहायता निधी कक्षातर्फे नागपूर शहरात विविध ठिकाणी ६९ आरोग्य शिबिरे घेण्यात आली. यात ३१,७४० नागरिकांची आरोग्य तपासणी, ४४६३ नागिरकांची रक्त तपासणी व २६४१ नागरिकांचे 'आभा-आयुष्यमान कार्ड' तयार करण्यात आले.

या शिबिरांमध्ये जनरल मेडिसीन, बालरोग, स्त्री रोग, कान- नाक- घसा, नेत्ररोग, दंतरोग, शल्यचिकित्सा, अस्थिरोग, हृदयरोग तपासणी, ईसीजी, आभा कार्ड व आयुष्यमान भारत नोंदणी आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. या शिबिरांमध्ये ज्या रुग्णांना एक्सरे, सीटी स्कॅन, एमआरआय, अँजिओग्राफी, नेत्र, रक्त, मुत्र तपासणी इत्यादी चाचण्या व त्यानंतर आवश्यक उपचार, शस्त्रक्रिया शासकीय योजने अंतर्गत निःशुल्क करण्याची कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर झालेल्या महाआरोग्य शिबिराचा लाभही २० ते २५ हजार रुग्णांनी घेतला. मात्र हे शिबिर केवळ एक दिवसाचे नाही. या शिबिरात ज्यांना गंभीर आजार आढळले, त्यांच्या तपासण्या आणि पुढील उपचारही निःशुल्क केले जाणार आहेत तसेच त्यांच्या औषधांचीही निःशुल्क व्यवस्था करण्यात आली आहे.

गंभीर आजारामुळे अनेकदा कर्जबाजारी होण्याची, कधी घरदार विकण्याची पाळी कित्येकांवर येते, मात्र ही वेळ कुणावरही येऊ नये यासाठी संवेदनशील मुख्यमंत्र्यांनी संकल्प केला आहे. त्यामुळेच नागपुरात झालेले हे महाआरोग्य शिबिर रुग्णांसाठी एक वरदान ठरले आहे.

**-अविनाश महालक्ष्मे**





# शास्त्रीय गायक वसंतराव देशपांडे

हिंदुस्तानी शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीत क्षेत्रातील वसंतराव देशपांडे आघाडीचे गायक होते. त्यांना संगीत नाटक अकादमीने पुरस्कार देऊन गौरविले होते.

वसंतराव देशपांडे यांचा जन्म १९२० साली झाला. विदर्भातील एका देशस्थ ब्राह्मण कुटुंबात जन्मलेल्या वसंतरावांचे वडील श्रीमंत आणि जमीनदार होते. मात्र, वसंतराव लहान असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर वसंतरावांना घेऊन त्यांची आई सासरच्या घरातून बाहेर पडली. त्यांची काहीही चूक नसताना त्यांचा त्या घरातील हक्क नाकारण्यात आला.

वसंतराव लहान असतानाच सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक भालजी पेंढारकरांनी त्यांच्यातील कलागुण हेरले. त्यांना १९३५ साली प्रदर्शित झालेल्या कालियामर्दन या हिंदी चित्रपटात कृष्णाची भूमिका मिळाली. त्यानंतर वसंतराव कलाकार म्हणून उदयास आले. पुढे अनेक गुरुंकडून त्यांनी संगीताचे मार्गदर्शन घेतले.

त्यांचे संगीताचे प्राथमिक शिक्षण नागपूरला शंकरराव सप्रे यांच्याकडे झाले. सप्रे ख्यातनाम शास्त्रीय गायक



विष्णू दिगंबर पलुसकरांचे शिष्य होते. नंतरच्या काळात भेंडी बाजार घराण्याचे गायक अमान अली खान आणि अंजनीबाई मालपेकर, किराणा घराण्याचे गायक सुरेशबाबू माने, पतियाळा घराण्याचे असद अली खान आणि ग्वाल्हेर घराण्याचे रामकृष्णबुवा वझे अशा मातब्बर गायकांकडे त्यांना शिकायला मिळाले, मात्र दीनानाथ मंगेशकरांच्या गायकीचा वसंतरावांच्या गाण्यावर मोठा प्रभाव होता. नामवंत दीनानाथ मराठी नाट्य कलाकार, नाट्य संगीत दिग्दर्शक आणि हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील मोठे नाव होते.

वसंतरावांना मंगेशकरांच्या गायकीचे खरे व एकमेव वारसदार मानले जात असले, तरी वसंतरावांचा नक्कल करण्यास विरोध होता. शास्त्रीय, उपशास्त्रीय संगीतात त्यांनी दाखवलेली प्रतिभा अजोड होती. गायनाबरोबरच ते उत्तम तबलावादक व पेटीवादकही होते. सरगम ही त्यांची एक विशेष खासियत होती. त्यांनी राज कल्याण हा राग तयार केला. हा एक यमन रागाचा प्रकार असून यामध्ये पंचम वर्ज्य आहे. हिंदुस्तानी शास्त्रीय गायनातील ठुमरी, दादरा, गझल या प्रकारांवरही त्यांची हुकमत होती. लाहोरमध्ये शिक्षण घेत असताना ते ऊर्दू भाषा शिकले, त्याचा त्यांना गझल गायनासाठी उपयोग झाला. त्यांचे ३० जुलै १९८३ रोजी पुण्यात निधन झाले.

(सौजन्य टाटा टेक्नॉलॉजीस)




## भविष्यात नेटवर्कशिवाय चालणार स्मार्टफोन

तुम्ही कधीतरी एखाद्या दुर्गम भागात असलेल्या खेडेगावात गेलाय. ट्रेकिंगसाठी एखाद्या जंगलात, पर्वतावर गेलाय आणि तिथे फोनचं नेटवर्क पूर्णपणे गायब झालंय, असं कधी तुमच्यासोबतही घडलंय का? अशावेळी फोन किंवा मेसेसच्या माध्यमातून संपर्क साधणं कठीण होऊन जातं. मात्र तुमच्या हातात असलेला स्मार्टफोन हा कुठल्याही मोबाईल टॉवर किंवा अंतराळातून येणाऱ्या सिग्नलच्या माध्यमातून चालला तर, आता अशीच सुविधा निर्माण करण्यासाठी प्रसिद्ध ई-कॉमर्स आणि टेक कंपनी ॲमेझॉन हिने तयारी सुरू केली आहे.



ॲमेझॉन आता तुमच्या हातामधील स्मार्टफोनला थेट अंतराळाशी जोडण्याच्या तयारीत आहे. कंपनीने आपल्या ॲमेझॉन लियो प्रोजेक्टअंतर्गत नवं डायरेक्ट टू डिव्हाईस नेटवर्क लॉन्च करण्याची तयारी सुरू केली आहे. या माध्यमातून मोबाईल नेटवर्क नसलं तरी युझर्सनां फोन कॉल, मेसेजिंग, इंटरनेट डेटा आणि इमर्जन्सी सेवांचा वापर करता येणार आहे.

ॲमेझॉनने यासाठी अमेरिकन रेग्युलेटर एफसीसीकडे अर्ज सादर केला आहे. त्यामधून ५ हजार १०५ लो अर्थ ऑर्बिट ,सॅटेलाईट तैनात करण्याची परवानगी मागण्यात आली आहे. जर याला मान्यता मिळाली तर ही सेवा २०२८ पासून दिली जाईल. कंपनीचं हे नेटवर्क डायरेक्ट टू डिव्हाईस (D२D) घर, ऑफिसमधील ब्रॉडबँडऐवजी थेट तुमच्या स्मार्टफोनशी कनेक्ट होणार आहे. ही सेवा जगभरातील टेलिकॉम ऑपरेटर्ससोबत मिळून काम करेल. त्यामुळे दुर्गम भाग, जंगल, समुद्र किंवा आपत्तीनिवारणामुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रांमध्ये नेटवर्क पोहोचवणं शक्य होणार आहे.

तसेच ॲमेझॉनने हल्लीच ग्लोबलस्टारचं स्पेक्ट्रम ॲसेट खरेदी केलं आहे. तो सध्या ॲपल आयफोनच्या इमर्जन्सी एसओओएस फिचर्सला सपोर्ट करते. ॲमेझॉन आता भविष्यातील सॅटेलाईट सर्व्हिससाठी ॲपलसोबत काम करण्याची योजना आखत आहे.

हल्ली सर्वच क्षेत्रांमध्ये स्पर्धा वाढली आहे. त्याला मोबाईल, इंटरनेट तरी कसे अपवाद ठरणार. नवनवीन कल्पना यामध्ये येत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# लोकप्रिय पार्श्वगायक सोनू निगम

सोनू निगम हे हिंदी चित्रपटसृष्टीतील एक लोकप्रिय पार्श्वगायक आहे. सोनू निगमचा जन्म ३० जुलै १९७३ रोजी फरिदाबाद, हरयाणा येथे झाला. चित्रपटांसोबतच त्याने स्वतःचे स्वतंत्र अल्बमही केले आहेत. सचिन पिळगावकर यांच्या एका मराठी चित्रपटात त्याने गाणे व पाहुण्या कलाकाराची भूमिका केली होती. काही हिंदी चित्रपटांत त्यांनी नायकाच्या भूमिकाही केल्या आहेत, पण तो प्रयत्न मात्र फारसा यशस्वी ठरला नाही. सोनू निगम यांनी उत्तर अमेरिका, युरोप, मध्य पूर्व आफ्रिका, आशिया आणि ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये कामगिरी बजावली आहेळे त्याने आपल्या नावाचे स्पेलिंग 'Nigam' ऐवजी 'Niigaam' असे बदलले होते, पण अधिक भरभराटीचे कोणतेही चिन्ह न दिसल्यामुळे स्पेलिंग परत पूर्ववत केले.

त्यांचे मुंबईतले सुरुवातीचे वास्तव्य धडपडीचे होते. टी-सीरीज कंपनीचे मालक यांनी त्यांना संधी दिली, पण त्यातही त्यांना मोहम्मद रफीचीच गाणी गाण्यासाठी मिळाली. त्यामुळे बऱ्याच लोकांपर्यंत आपला आवाज पोहचवूनही त्यांच्यावर बऱ्याच जणांनी ते रफीची नक्कल करीत असल्याचा शिक्का मारला. १९९०मध्ये त्यांनी जानम चित्रपटासाठी पहिले गाणे गायले, पण काही



**निमित्त**

कारणास्तव तो चित्रपट बंद पडला. दरम्यान, त्यांनी आकाशवाणीवरच्या जाहिरातींना आवाज दिला. नंतर झी वाहिनीच्या सा रे ग म या कार्यक्रमाने त्यांना ओळख दिली. मग त्यांनी मागे वळून पाहिले नाही. बेवफा सनम चित्रपटातले त्याचे 'अच्छा सिला दिया तूने' हे गाणे तुफान गाजले आणि पार्श्वगायक म्हणून स्थिरावण्याची संधी त्याला मिळाली.

सोनूने सा रे ग म मध्ये सूत्रधाराची भूमिका केल्यानंतर त्यांना अधिकाधिक गाणी मिळू लागली. १९९७च्या बॉर्डर चित्रपटातले संदेसे आते है हे त्यांचे गाणे सुपरहिट झाले. त्यानंतर त्याच वर्षी परदेस चित्रपटातले ये दिल दिवाना हे गाणे त्याला रफीच्या नकलेचा शिक्का पुसण्यास कामी आले. त्यानंतर त्याची स्वतंत्र शैली सर्वांनीच मान्य केली, तसेच रोल मॉडेल म्हणूनही तो गणला जाऊ लागला. गाण्यात भावना व्यक्त करणे, आवाजांचा पोत बदलणे यामुळे त्याला महान गायकांच्या श्रेणीत बसायला फार वेळ लागला नाही.

हिंदीप्रमाणेच सोनूने बंगाली, उडिया, कानडी, पंजाबी, तामिळ, तेलुगू, इंग्रजी, भोजपुरी, ऊर्दू, नेपाळी, मराठी या भाषांतही गाणी म्हटली आहेत. सोनूने संगीताचे शिक्षण उस्ताद गुलाम मुस्तफा खान यांच्याकडून घेतले.

सोनूच्या पत्नीचे नाव मधुरिमा असून २००२मध्ये या दोघांचे लग्न झाले. या दाम्पत्याला एक मुलगा असून त्याचे नाव नवीन आहे. २०११मध्ये धनुषने गायलेले 'व्हाय धीस कोलावरी डी' या गाण्याच्या चाइल्ड व्हर्जन नवीनने गायले होते.

सोनू निगमची आई शोभा यांचे फेब्रुवारी २०१३ मध्ये निधन झाले. 'सिंह साहब दी ग्रेट' (२०१३) या सिनेमातील शीर्षक गीत तीशा निगमने गायले होते. या सिनेमाद्वारे तिने आपल्या करिअरला सुरुवात केली. तर निकिताने २००६मध्ये 'प्यारे मोहन' या सिनेमात आपल्या करिअरमधील पहिले गाणे गायले होते. या गाण्याचे बोल होते, 'रब्बा दे दे जवानी'. या गाण्यात तिच्यासह सुनिधी चौहानेसुद्धा स्वरसाज चढवला होता.

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### सतत थकवा, अशक्तपणा येतोय... हे वाचा!

शरीर एखाद्या मशिनीसारखं काम करत असतं. ही मशीन सुरळीत चालण्यासाठी वेगवेगळ्या गोष्टींची गरज भासते. प्रोटीन, व्हिटामिन आणि कॅल्शिअम या गोष्टी आपल्याला माहीत असतील, पण या पुरेशा नाहीत. शरीराला काही आवश्यक मिनरल्सची सुद्धा गरज असते. ज्यातील एक म्हणजे मॅग्नेशिअम. मॅग्नेशिअम शरीराच्या वेगवेगळ्या प्रक्रियांमध्ये महत्वाची भूमिका बजावतं. स्नायू, नसा, हाडे आणि शरीराची ऊर्जा निर्माण करण्यात मॅग्नेशिअम मदत करतं, पण अनेकदा आहारातील काही चुकांमुळे शरीरात मॅग्नेशिअमची लेव्हल कमी होऊ शकते, ज्यामुळे शरीरात काही संकेत दिसू लागतात, पण सामान्य समजून जास्तीत जास्त लोक याकडे दुर्लक्ष करतात. मॅग्नेशिअम कमी झाल्यावर शरीर कोणते संकेत देतं ते पाहुयात, जेणेकरून वेळीच उपाय करता येतील.



बऱ्याच लोकांसोबत असं होतं की, भरपूर झोप घेतल्यानंतरही त्यांनी कमजोरी किंवा थकवा जाणवत राहतो. याची कारणे वेगवेगळी असू शकतात, ज्यातील एक म्हणजे पोषक तत्वांची कमतरता. मॅग्नेशिअम शरीरात ऊर्जा निर्माण करण्याच्या प्रक्रियांमध्ये मदत करतं. त्यामुळे हे कमी झाल्यावर सुस्ती, थकवा, कमजोरी जाणवते.

मॅग्नेशिअम शरीराचं नर्वस सिस्टीम शांत ठेवण्यास मदत करतं. मॅग्नेशिअमचा संबंध चांगल्या झोपेशी जोडण्यात येतो. अशात जर हे कमी झालं तर काही लोकांना झोपेसंबंधी समस्या होऊ शकतात किंवा वारंवार झोपमोड होण्याचा देखील त्रास होऊ शकतो.

मॅग्नेशिअम हे असं मिनरल आहे जे मेंदूत न्यूरोट्रान्समीटरचं संतुलन कायम ठेवण्यास मदत करतं. हे कमी झालं तर चिडचिड, अस्वस्थता किंवा मूड चेंज यांसारख्या समस्या जाणवू शकतात. पण केवळ या लक्षणांच्या आधारावर मॅग्नेशिअम कमी झाल्याचं ठरवता येऊ शकत नाही.

मॅग्नेशिअम कमी झाल्यावर काही लोकांना भूक कमी लागणे, मळमळ होणे किंवा पोटासंबंधी समस्यांचा सामना करावा लागू शकतो. शरीरात मिनरल्सचं संतुलन बिघडल्याने पचनक्रियाही प्रभावित होते.

आहारात काही नॅचरल गोष्टींचा समावेश करून मॅग्नेशिअम मिळवता येऊ शकतं. हिरव्या पालेभाज्या जसे की, पालक, नट्स जसे की, बदाम - काजू, भोपळ्याच्या बिया, कडधान्य, डाली आणि डार्क चॉकलेटमधून मॅग्नेशिअम मिळवता येऊ शकतं.

# मुरुडच्या वादळग्रस्तांना आधार

## महात्मा फुले पतसंस्थेकडून ३० हजारांची मदत

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरात अलीकडे झालेल्या चक्रीवादळासह मुसळधार पावसामुळे दोन कुटुंबांचे मोठे नुकसान झाले. या आपद्ग्रस्तांना तातडीची मदत म्हणून मुरुड महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेने प्रत्येकी १५,००० रुपयांची आर्थिक मदत दिली आहे.



शहरातील चाळीत राहणाऱ्या जयश्री रामचंद्र पडवळ यांच्या घराचे वादळी वाऱ्यात संपूर्ण छप्पर कोसळले. मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या आणि जवळचे नातेवाईक नसलेल्या जयश्री पडवळ यांना या दुर्घटनेमुळे बेघर व्हावे लागले. ही माहिती माजी समाज अध्यक्ष महेश कारभारी यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना दिली. त्यानंतर संचालकांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. संस्थेच्या पदाधिकारी, संचालक आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पडवळ यांना आपद्ग्रस्त निधीतून १५,००० रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

त्याचप्रमाणे चक्रीवादळात जुनीपेठ येथील मोहन वर्तक यांच्या घराचेही छप्पर उडून मोठे नुकसान झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. ही बाब ज्येष्ठ संचालक आदेश दांडेकर यांनी संस्थेच्या मासिक बैठकीत मांडली. बैठकीत तातडीने निर्णय घेऊन आपद्ग्रस्त निधीतून वर्तक यांनाही १५,००० रुपयांची मदत तत्काळ देण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष म्हणाले, "नैसर्गिक आपत्ती कधी आणि कोणावर कोसळेल याचा अंदाज बांधता येत नाही. सरकारी मदत मिळण्यास वेळ लागू शकतो. अशा वेळी संस्थेकडून दिलेली ही मदत जरी मर्यादित असली, तरी संकटाच्या काळात संस्था नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे, हा विश्वास या मदतीतून व्यक्त झाला आहे."

मुरुड महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेच्या या सामाजिक उपक्रमाचे परिसरातील नागरिकांकडून स्वागत होत असून, संकटग्रस्तांना वेळेवर दिलासा देण्याच्या संस्थेच्या भूमिकेचे कौतुक केले जात आहे.

# एक्स्प्रेस वेवर सापडली चोरीची स्प्लेंडर

## हेल्प फाउंडेशन, पोलीस आणि महामार्ग कर्मचाऱ्यांची सतर्कता

**खोपोली : प्रतिनिधी**

हेल्प फाउंडेशनच्या सदस्यांची सतर्कता, महामार्ग कर्मचाऱ्यांची जागरूकता आणि पोलीस यंत्रणेच्या तत्परतेमुळे खोपोलीतील एका नागरिकाची चोरीला गेलेली मोटरसायकल त्याला परत मिळाली आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील मुंबई लेनवर कि.मी. २३.९०० दरम्यान एक स्प्लेंडर मोटरसायकल बराच वेळ रस्त्याच्या कडेला उभी असल्याचे महामार्गावरील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आले. सुरुवातीला ती कोणीतरी तात्पुरती पार्क केली असावी असा समज होता. मात्र दीर्घकाळ ती त्याच जागी असल्याने सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली.

घटनास्थळाचे जिओ-टॅग फोटो काढून हायवे कंट्रोलला माहिती देण्यात आली. याचवेळी डेल्टा फोर्सचे जवान तथा हेल्प फाउंडेशनचे सदस्य प्रवीण सावंत यांनी ही माहिती वरिष्ठांपर्यंत पोहोचवली.वाहन क्रमांकाच्या आधारे जिल्हा वाहतूक पोलीस शाखेतील कर्मचारी राजेंद्र राठोड



यांच्या मदतीने मालकाचा तपशील मिळवला असता, ही मोटरसायकल खोपोलीतील क्रांतीनगर परिसरात राहणारे प्रवीण सोनवणे यांची असल्याचे समोर आले. प्रवीण सोनवणे यांचा मोबाईल बंद असल्याने परिसरातील लोकप्रतिनिधी निजामुद्दीन जळगावकर यांच्याशी संपर्क साधण्यात आला. त्यांनी तातडीने सोनवणे यांच्याशी संपर्क साधला. त्यावेळी धक्कादायक माहिती मिळाली की, ती मोटरसायकल चोरीला गेली होती आणि त्याबतची तक्रार खालापूर तालुका पोलीस ठाण्यात आधीच दाखल करण्यात आली होती.

दरम्यान, खालापूर पोलीस ठाण्याचे अधिकारी चंद्रकांत हाके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी अमोल राठोड आणि इतर कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन प्रवीण सोनवणे यांच्या उपस्थितीत तांत्रिक आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मोटरसायकल त्यांच्या ताब्यात दिली. या प्रक्रियेत डेल्टा फोर्सचे जवान ऋषिकेश शेलार यांनीही मोलाचे सहकार्य केले.या घटनेतून महामार्ग कर्मचाऱ्यांची जागरूकता, हेल्प फाउंडेशनच्या सदस्यांची तत्परता, पोलिस यंत्रणेचा त्वरित प्रतिसाद आणि लोकप्रतिनिधींचा प्रभावी समन्वय यामुळे एका नागरिकाला त्याची गमावलेली मालमत्ता परत मिळू शकली. दरम्यान, अगदी योग्य वेळी योग्य अशी माहिती योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचल्याने हा सकारात्मक परिणाम दिसून आला आहे. त्यामुळेच दुचाकी पुन्हा शोधण्यात मदत झाली.

# भूमी अभिलेख कार्यालयाकडून तुपगाव ग्रामस्थांना सनद वाटप

**चौक : प्रतिनिधी**

उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय खालापूर यांच्याकडून ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थांना सनद वाटप करण्याचा कार्यक्रम नुकताच तुपगाव येथे करण्यात आला. यावेळी सरपंच रवींद्र कुंभार उपस्थित होते.

स्वामित्व योजना देशाच्या ग्रामीण विकासासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. ग्रामीण भारतात मालमत्तांच्या हक्कांवरून नेहमीच वाद उद्भवतात. गरीबांच्या जमिनींवर ताबा मिळवण्याची प्रकरणे वारंवार घडतात.अशा समस्यांचे निराकरण करण्यासाठी भारत सरकारने स्वामित्व योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.२४ एप्रिल २०२१ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राष्ट्रीय पंचायती राज दिनानिमित्त या योजनेची घोषणा केली. स्वामित्व योजना केवळ मालमत्तांवरील वाद मिटवण्याचे साधन नाही, तर ग्रामीण भागातील मालकी हक्कांसाठी एक नवा अध्याय सुरू करणारी योजना आहे.

स्वामित्व योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. या अंतर्गत ग्रामीण भागातील सर्व जमिनींचे ड्रोनद्वारे अचूक मोजमाप केले जाईल आणि मालकांना त्यांच्या जमिनींचे ई-प्रॉपर्टी कार्ड देण्यात येईल. या कार्डामुळे गावातील प्रत्येक मालकाला त्याच्या मालकीच्या जमिनीचा अधिकृत पुरावा मिळेल. ग्रामीण भागातील अनेक लोकांकडे आजही मालमत्तेची कागदपत्रे नाहीत. ई-प्रॉपर्टी कार्ड म्हणजे मालमत्तेचा डिजिटल पुरावा, जो व्यक्तीच्या मालकी हक्काची खात्री देतो, असे उप अधिक्षक भूमी अभिलेख प्रमोद जरग यांनी सांगितले.

तुपगाव येथे २४० सनद धारक असून १८४ जणांनी आपली सनद ताब्यात घेतली, एकूण ५६ खातेदार बाकी आहेत. ७७ टक्के काम पूर्ण झाले असून एकुण वसुल करावयाची सनद फी - १९०६२५/- असून १५७४४५ एवढी वसुली एकाच दिवशी झाली आहे. वसुलीची टक्केवारी ८२.६०% आहे.



# 'मुरूडमधील प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत सेसचा लाभ पोहचवणार'

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड पंचायत समितीच्या सेस योजना आणि जिल्हा परिषद सेस योजनांचा लाभ गोरगरीब नागरिकांसह खेडी, गावे, वाड्या आणि पाड्यांतील प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याची ग्वाही महिला व बाल कल्याण समिती सभापती रसिका केणी यांनी दिली.



मुरुड पंचायत समिती कार्यालयात आयोजित कार्यक्रमात जिल्हा परिषद सेसमधून मुलींना सायकल वाटप, गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. तसेच पंचायत समिती मुरुड सेस फंड २०२५-२६ मधून अंगणवाडी सेविकांना स्टील ट्रॉली, कुकर आणि इतर साहित्याचे वाटप करण्यात आले.यावेळी बोलताना सभापती रसिका केणी म्हणाल्या, "या योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचावा यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून प्रभावी नियोजन करण्यात येणार आहे. विशेषतः मुरुड तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ वेळेत आणि पारदर्शकपणे मिळावा यासाठी विशेष लक्ष केंद्रित करण्यात येईल."

"समाजातील वंचित आणि गरजू घटकांपर्यंत शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होईल यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील," असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाला जिप महिला बालकल्याण विभाग सभापती रसिका केणी, जिप सदस्या मानसी दळवी, मुरुड तालुका बांधकाम संघटनेचे अध्यक्ष दिनेश मिनमिने, उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचिक, जिप सदस्या ज्योती नागावकर, मुरुड पं. समिती सभापती निलेश घाटवळ, उपसभापती अश्विनी जंगम, सदस्या अश्विनी डोंगरीकर, सदस्य गणेश नाक्ती, गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ, बालविकास प्रकल्प अधिकारी संजय शेडगे, सहाय्यक गटविकास अधिकारी मंगेश पाटील, पर्यवेक्षिका दिनेश वारगे, शिघ्रे सरपंच संतोष राणे, शिक्षक वर्ग आणि अंगणवाडी केंद्राच्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या.


## PUBLIC NOTICE

Laxmi Ophthalmic Services Pvt.Ltd. through this Notice inform all Public that the old Medical Records of OPD from 01/04/2020 to 31/03/2022 and IPD from 01/04/2019 To 31/03/2020 (Except MLC, Court Cases & Pediatrics Cases) are to be discarded at the following locations at. Kudave, Village, Palaspe ,Panvel . any patient who wants to collect their medical documents may Contact The MRD Department at Laxmi Ophthalmic Services Pvt. Ltd, Uran Road, Old Panvel 410206 After one month of publication of this notice. We will destroy all Medical Records from 01/04/2020 To 31/03/2022 OPD and from 01/04/2019 To 31/03/2020 IPD records (Except MLC, Court Cases & Pediatrics Cases) and will not be responsible for same.

Date : 29/07/2026

## PUBLIC NOTICE

Laxmi Charitable Trust. Panvel Through This Notice Inform All Public That The Old Medical Records Of OPD Form 01/04/2020 To 31/03/2022 And IPD Form 01/04/2019 To 31/03/2020 ( Except MLC, Court Cases & Pediatrics Cases ) Are To Be Discarded At The Following locations At. Kudave, Village, Palaspe, Panvel. Any patient Who Wants To Collect their medical documents .may Contact The MRD Department at Laxmi Charitable Trust, Uran Road, Old Panvel 410206 After one month of publication of this notice. We Will destroy all Medical Records Form 01/04/2020 To 31/03/2022 OPD And Form 01/04/2019 To 31/03/2020 IPD (Except MLC, Court Cases & Pediatrics Cases ) And Will Not Be Responsible For Same.

Date : 29/07/2026

## सार्वजनिक सूचना

लक्ष्मी ऑफथॅल्मिक सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड या सूचनेद्वारे सर्व जनतेला कळवीत आहे की ०१/०४/२०२० ते ३१/०३/२०२२ पर्यंतच्या ओपीडी आणि ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० पर्यंतच्या आयपीडी च्या जुन्या वैद्यकीय नोंदी (एम एल सी, न्यायालयीन प्रकरणे वगळता) खालील ठिकाणी नष्ट करण्यात येईल. कुडावे गाव, पळस्पे ,पनवेल. ज्या रुग्णांना त्यांचे वैद्यकीय कागदपत्रे घ्यायची आहेत त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर पुढील पत्त्यावर संपर्क करावा.एम आर डी विभाग, लक्ष्मी ऑफथॅल्मिक सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, उरण रोड, जुने पनवेल येथील आम्ही एक महिन्यांनंतर दिनांक ०१/०४/२०२० ते ३१/०३/२०२२ पर्यंतच्या ओपीडी आणि ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० आयपीडी च्या (एम एल सी कोर्ट केसेस आणि पेडियाट्रिक केसेस वगळता) सर्व वैद्यकीय नोंदी नष्ट करू आणि त्या नंतर कुठल्याही पत्रव्यवहारला आम्ही जबाबदार राहणार नाही.

दिनांक : २९/०७/२०२६

## सार्वजनिक सूचना

लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट, पनवेल, या सूचनेद्वारे सर्व जनतेला कळवीत आहे की ०१/०४/२०२० ते ३१/०३/२०२२ पर्यंतच्या ओपीडी आणि ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० पर्यंतच्या आयपीडी च्या जुन्या वैद्यकीय नोंदी (एम एल सी न्यायालयीन प्रकरणे वगळता) खालील ठिकाणी नष्ट करण्यात येईल कुडावे गाव, पळस्पे, पनवेल. ज्या रुग्णांना त्यांचे वैद्यकीय कागदपत्रे घ्यायची आहेत त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर पुढील पत्त्यावर संपर्क करावा. एम आर डी विभाग, लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट, उरण रोड, जुने पनवेल येथील आम्ही एक महिन्यांनंतर दिनांक ०१/०४/२०२० ते ३१/०३/२०२२ पर्यंतच्या ओपीडी आणि ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० आयपीडी च्या (एम एल सी, कोर्ट केसेस आणि पेडियाट्रिक केसेस वगळता) सर्व वैद्यकीय नोंदी नष्ट करू आणि त्या नंतर कुठल्याही पत्रव्यवहारला आम्ही जबाबदार राहणार नाही.

दिनांक : २९/०७/२०२६

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे वावोशी, ता-खालापुर, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

**- मिळकतीचे वर्णन-**

**मौजे : वावोशी, तालुका- खालापुर, जिल्हा - रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर पॉ. | आकाराणी रू. पै. |
|---|---|---|---|---|
| वावोशी | १ मंगळ साधुराम पाटील<br>२ राजेश साधुराम पाटील<br>३ शैलेश साधुराम पाटील<br>४ समिता सुदाम पाटील.<br>५ भरत जानु पाटील<br>६ रामचंद्र जानु पाटील<br>७ वामन जानु पाटील<br>८ मारूती जानु पाटील<br>९ पार्वती महादु पाटील<br>१० वासुदेव महादु पाटील<br>११ कृष्णा महादु पाटील<br>१२ कल्पना हरिश्चंद्र ढाकोळ<br>१३ पाडुरंग जानु पाटील<br>१४ वंदना लक्ष्मण पाटील<br>१५ सरिता गणेश पाटील<br>१६ जयंत लक्ष्मण पाटील<br>१७ प्रकाश लक्ष्मण पाटील<br>रा. सर्व-वाकरूळ, कामार्ली, ता. पेण जि. रायगड | २६१ | ०.६२.०० जिरायत.<br>०.१४.०० पो. ख<br>०.७६.००<br>हे. आर. पॉ. | १८.६२ |
| | | २६२ | १.७४.८० जिरायत.<br>०.१४.९० पो. ख<br>१.८९.७०<br>हे. आर. पॉ. | २६.३१ |
| | | २६३ | ०.४७.८० जिरायत.<br>०.०४.३० पो. ख<br>०.५२.१०<br>हे. आर. पॉ. | ८.०० |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २९/०७/२०२६

सही/-
**ॲड. सरिता महेंन्द्र साखरे**

पत्ता- बंन्सल असोसिएट्स, पहिला मजला प्लॉट नं. ३०, सेक्टर. १/२, रोड नं.४ नविन पनवेल, बालाजी मंदिरच्या समोर ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **श्री. संजय लक्ष्मण धरणेकर व इतर ६** यांचेकडून विकसनाकरिता घेण्याच्या विचारात आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः

**-: मिळकत वर्णन :-**

**मौजे नैना नगरपरियोजना क्र. १, तालुका - पनवेल, जिल्हा रायगड (नैना)**

| नगर भूमापन क्र. | क्षेत्र चौ.मी. | धारणाधिकार |
|---|---|---|
| अंतिम भूखंड क्र. ३७, TP स्कीम ०१ | ९१२.०० | क |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहीवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर '१४ दिवसांच्या आत' आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, दावा न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण .: पनवेल
तारीख : २९/०७/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश मनोहर पांचाळ**

पत्ताः ३५, सत्य साई प्लाझा, प्लॉट नं. ५, सेक्टर ११, नवीन पनवेल (पू.)-४१०२०६, मो. ८२९१३२२३३८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट 'अ' मध्ये वर्णन केलेली मिळकत प्रस्तावित **श्री. दिगंबर ज्ञानदेव पाटील** राहणार मु. पो. मोसारे, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील असून सदर मिळकत आमचे पक्षकार हे खरेदी करणार असुन सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे मोसारे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| | गट क्रमांक | उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| 1) | 38 | 1/2<br>एकुण | 0-29-60<br>पो. ख.<br>0-03-00<br>0-32-60 | 5.81 |
| 2) | 42 | 2/1/क<br>एकुण | 0-15-00<br>पो.ख.<br>0-01-00<br>0-16-00 | 3.06 |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेल्या मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कासल्याही प्रकारचे करार - मदार, गहान, दान, बक्षीस,फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम. ओ. यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून **14** दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकत खरेदी करतील व त्यानंतर आलेल्या तकारी दावे हरकती या रद्दवातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी .

दिनांक : 29.07.2026
ठिकाण : पनवेल

सही/-
**ॲड. महेश ग. भगत**
बी.ए.एल.एल.बी

पत्ता : गुरूकृपा, प्लॉट नं. 64 बी, नवीन पनवेल, तालुका . पनवेल, जि. रायगड. मो. नं. - 8652034703

## महाराष्ट्र शासन
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग यांचे कार्यालय**

काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड.
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३, ई-मेल : ddr_rgd@rediffmail.com

जा. क्र. जिउनि/गृह/मोफा क्र.११/मा.अभि/जाहीर नोटीस / / सन २०२६

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानवी अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेयस बाबत) जाहीर नोटीस**

कमंडर रिनायन्सेस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., सर्व्हे नं. ९६/०२ हिस्सा नं. २/ए. ४,५,६ नेरे गाव, ता. पनवेल जि. रायगड यांनी मेसर्स रिनायन्सेस इस्टेट डेव्हलपर्स तर्फे भागीदार १. श्री अरविंद लक्ष्मण पाटील. २. श्री दिनेश व्यंकटेश नायक, ३. श्रीमती आरती दिनेश नायक. ४. श्रीमती वंदना केदार पाटील. ५. श्री मोहमद इक्बाल अफाक खान, ६. श्री मोहमद फरहान इक्बाल खान. ७. श्री मोहमद मोमन इक्बाल खान, पत्ता- सर्व्हे नं. ९६. हिस्सा नं. २/४. नेरे गाव, कोप्रोली गाव बाजूला, ता. पनवेल, जि. रायगड यांचे विरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

रायगड जिल्ह्यातील ता. पनवेल, गाव नेरे येथील गट क्रमांक व उपविभाग ९६/२/२/अ. गट क्रमांक व उपविभाग- ९६/२/४ गट क्रमांक व उपविभाग- ९६/२/५, गट क्रमांक व उपविभाग- ९६/२/६. याचे एकूण क्षेत्र १३.३२० चौ. मी.

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते. स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक १३/०८/२०२६ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक- २८/०७/२०२६

सही/-
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
सहकारी संस्था, रायगड अलिबाग

# "हिंदू दहशतवाद" कथानकासाठी मोदी-शाह होते टार्गेट?








**स्मिता प्रकाश :** कसाबच्या हातातील कलावामुळे तो भारतीय म्हणून दाखवण्याचा जो प्रयत्न झाला आणि '२६/११'चा संपूर्ण कथानक वेगळ्या दिशेने वळवण्याचा प्रयत्न झाला, मात्र तो प्रयत्न अयशस्वी ठरला.

**आर.व्ही.एस. मणी :** ६ किंवा ७ जानेवारी २००९च्या सुमारास पाकिस्तानला अधिकृतरीत्या मान्य करावे लागले की अजमल कसाब हा त्यांचाच नागरिक आहे.

**स्मिता प्रकाश :** त्यावेळी तुम्ही या घटनेची अधिकृत नोंद केली होती का? 'एफआयआर' दाखल झाला होता का?

**आर.व्ही.एस. मणी :** होय, गृहमंत्रालयाच्या विशेष सचिवांनी दिल्ली पोलीस आयुक्तांना अधिकृत पत्र पाठवले होते. सुमारे सहा महिन्यांनंतर पोलिसांकडून उत्तर आले, मात्र त्या उत्तरात फारशी माहिती नव्हती. माझ्या दृष्टीने हा प्रश्न कायम राहतो – माझ्या हालचालींची इतकी अचूक माहिती त्या लोकांना कशी मिळाली?

**स्मिता प्रकाश :** इशरत जहाँ प्रकरणात तुमची भूमिका नेमकी काय होती?

**आर.व्ही. एस. मणी :** ६ ऑगस्ट रोजी मी पहिला प्रतिज्ञापत्राचा मसुदा (Affidavit) तयार केला. तो तत्कालीन गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी मंजूर केला होता. यानंतर ते अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले. दरम्यान, गृहराज्यमंत्री जयनारायण यांनी तो प्रतिज्ञापत्राचा मसुदा माध्यमांमध्ये दाखवला. चिदंबरम परत आल्यानंतर त्यांनी ती फाईल संयुक्त सचिवांकडून स्वतःकडे घेतली. त्यानंतर ती फाईल परत विभागाकडे आलीच नाही. यानंतर दुसरे प्रतिज्ञापत्र तयार करण्यात आले. मला सांगण्यात आले की, हे प्रतिज्ञापत्र दाखल करा. सरकारी सेवक म्हणून मला आदेशाचे पालन करणे बंधनकारक होते.

**स्मिता प्रकाश :** पहिल्या प्रतिज्ञापत्रात नेमके काय नमूद होते?

**आर.व्ही.एस. मणी :** पहिल्या प्रतिज्ञापत्रात स्पष्टपणे नमूद होते की, इशरत जहाँ आणि तिचे सहकारी गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी आणि राज्याचे गृहमंत्री अमित शाह यांची हत्या करण्यासाठी आले होते, मात्र नंतर माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यात बदल करून 'गुजरातमधील काही महत्त्वाच्या राजकीय व्यक्तींना लक्ष्य करण्यात आले होते' अशी सर्वसाधारण शब्दरचना केली.

**स्मिता प्रकाश :** म्हणजे पहिल्या प्रतिज्ञापत्रात स्पष्टपणे नमूद होते की, इशरत जहाँ आणि तिचे सहकारी नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांना लक्ष्य करण्यासाठी आले होते?

**आर.व्ही.एस. मणी :** होय, निष्कर्ष 'इंटेलिजन्स ब्युरो' (आयबी) आणि उपलब्ध गुप्तचर माहितीच्या आधारेच मांडण्यात आला होता. तो अत्यंत बारकाईने तपास करून तयार करण्यात आला होता.

**स्मिता प्रकाश :** म्हणजे तुम्हाला त्या तपासावर पूर्ण विश्वास होता?

**आर.व्ही. एस. मणी :** निश्चितच, मला त्या तपासावर पूर्ण विश्वास होता. नंतर डेव्हिड हेडलीने राष्ट्रीय तपास यंत्रणे (एनआयए)समोर दिलेल्या जबाबातही इशरत जहाँ ही 'लष्कर-ए-तोयबा'शी संबंधित असल्याचा उल्लेख केला होता. त्याआधी अमेरिकेच्या दूतावासातील लीगल अटॅशे डॅनियल क्लेक यांनीही अशाच प्रकारची माहिती दिली होती.

**स्मिता प्रकाश :** त्यांना ही माहिती कशी मिळाली होती?

**आर.व्ही.एस. मणी :** त्यांचा स्रोत नेमका कोणता होता, हे मला माहीत नाही, मात्र अमेरिकन दूतावासाने त्या माहितीची सत्यता पडताळून अधिकृतरीत्या ती दिली होती. मुझम्मिल बट्ट याच्याकडून मिळालेल्या माहितीतही अशाच प्रकारचा उल्लेख होता.

**स्मिता प्रकाश :** मुझम्मिल बट्ट हा अमेरिकेत होता, मात्र चौकशीदरम्यान डेव्हिड हेडलीने आपली भूमिका बदलली.

**आर.व्ही.एस. मणी :** होय, पी. चिदंबरम यांनी सुरुवातीला दुसऱ्या प्रतिज्ञापत्रावरील सही आपली नसल्याचे म्हटले. नंतर त्यांनी सांगितले की, त्यांनी फक्त काही 'संपादकीय बदल' (Editorial Changes) केले होते.

**स्मिता प्रकाश :** मग दुसरे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याची गरजच का पडली?

**आर.व्ही.एस. मणी :** मलाही त्याचे कारण कधी समजले नाही. मी भारत सरकारमध्ये अनेक वर्षे काम केले. माझ्या सेवाकाळात एखाद्या प्रकरणात केवळ राजकीय कारणासाठी अतिरिक्त प्रतिज्ञापत्र (Additional Affidavit) दाखल करण्यात आलेले मी पाहिले नव्हते. साधारणपणे पुरवणी प्रतिज्ञापत्र (Supplementary Affidavit) तेव्हाच दाखल केले जाते, जेव्हा नवीन तथ्ये किंवा नवीन पुरावे समोर येतात. या प्रकरणात तसे काहीही झाले नव्हते. पहिले प्रतिज्ञापत्र गुजरात उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार दाखल करण्यात आले होते. उच्च न्यायालयाने केंद्र सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले होते. आम्ही तसे केले. दुसरे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे कोणतेही न्यायालयीन निर्देश नव्हते. तो पूर्णपणे तत्कालीन गृहमंत्री पी. चिदंबरम यांचा निर्णय होता. ते प्रतिज्ञापत्र त्यांच्या कार्यालयात तीन वरिष्ठ कायदेतज्ज्ञांनी तयार केले. मला फक्त एवढे सांगण्यात आले, अटर्नी जनरल उपलब्ध नाहीत. हे प्रतिज्ञापत्र तातडीने न्यायालयात दाखल करा. गृहसचिवांनी मला ती फाईल दिली आणि मी ती न्यायालयात सादर केली.

**स्मिता प्रकाश :** दुसऱ्या प्रतिज्ञापत्रावर सही कुणाची होती?

**आर.व्ही.एस. मणी :** दोन्ही प्रतिज्ञापत्रांवर माझीच सही होती.

**स्मिता प्रकाश :** त्यावेळी गृहसचिव कोण होते?

**आर.व्ही.एस.मणी :** त्यावेळी जी. के. पिल्लई गृहसचिव होते.

**स्मिता प्रकाश :** जी. के. पिल्लई यांनी नंतर सार्वजनिकरीत्या असे म्हटले की, दुसरे प्रतिज्ञापत्र हे पूर्णपणे राजकीय पातळीवर तयार करण्यात आले होते.





**आर.व्ही.एस. मणी :** होय, ते दोन वेळा सार्वजनिकरीत्या बोलले आहेत. एकदा इशरत जहाँ प्रकरणात आणि दुसऱ्यांदा 'हिंदू दहशतवाद' या विषयावर दोन्ही वेळा त्यांनी स्पष्ट सांगितले की, दुसरे प्रतिज्ञापत्र हा प्रशासकीय नव्हे, तर राजकीय निर्णय होता. त्यांनी हेही सांगितले की, त्या निर्णयाशी बहुतेक अधिकारी सहमत नव्हते. माझ्या मते त्यांनी गृहसचिव म्हणून आपल्या पदाच्या मर्यादेपलीकडे जाऊन सत्य मांडले. १ डिसेंबर २०११ रोजी गुजरात उच्च न्यायालयाने 'एसआयटी'ची नियुक्ती केली. त्या नियुक्तीचा नेमका कायदेशीर आधार काय होता हे मला आजही माहीत नाही. त्यासंदर्भात अनेक प्रकारच्या चर्चा होत होत्या, पण मी कोणत्याही अफवांवर भाष्य करू इच्छित नाही. 'एसआयटी'मध्ये सतीश वर्मा यांची महत्त्वाची भूमिका होती. ते मूळचे 'गुजरात कॅडर'चे 'आयपीएस' अधिकारी होते. त्यांना याचिकाकर्त्यांच्या बाजूने साहाय्य करण्याची जबाबदारी देण्यात आली होती. इशरत जहाँची आई शमीमा कौसर आणि जावेद शेख (पूर्वाश्रमीचे प्रणेश पिल्लई) यांचे वडील गोपालकृष्ण पिल्लई यांच्या वतीने ते काम करत होते.

**स्मिता प्रकाश :** सतीश वर्मा त्यावेळी 'सीबीआय'मध्ये होते?

**आर.व्ही.एस. मणी :** नाही, ते त्यावेळी गुजरात पोलीस सेवेत होते, मात्र पुढे त्यांनी 'एसआयटी'मधील इतर काही अधिकाऱ्यांना बाजूला केले आणि तपासावर प्रभावी नियंत्रण मिळवले. ही बाब त्यांनी स्वतः मला सांगितली होती. त्यानंतर त्यांनी अनेक अधिकाऱ्यांशी वाद घातले. काहींना अपमानास्पद भाषेत बोलले. अनेक महिने हा संघर्ष सुरू होता.

**स्मिता प्रकाश :** यानंतर तुमची चौकशी सुरू झाली?

**आर.व्ही.एस. मणी :** होय, मला चौकशीसाठी बोलावण्यात आले. मी माझ्या प्रतिज्ञापत्रात जे लिहिले होते, त्यामध्ये बदल करण्यास नकार दिला. सुरुवातीला मला एका खोलीत बसवण्यात आले. औपचारिक प्रश्न विचारले जात होते. नंतर मला दुसऱ्या खोलीत नेण्यात आले. त्या खोलीत सतीश वर्मा बसले होते. ते सिगारेट ओढत होते. त्यांना मी म्हटले, "सिगारेटने मला त्रास होतो..." तर त्यावर ते म्हणाले, 'थांब, आता तुला सिगारेटनेच मारतो.' त्यांनी मला सांगितले, "तुमचे विधान बदला." मी स्पष्टपणे नकार दिला. मी त्यांना सांगितले की, मी माझ्या प्रतिज्ञापत्रात जे लिहिले आहे, ते उपलब्ध गुप्तचर माहिती, क्रॉस-फायर अहवाल, फॉरेन्सिक पुरावे आणि अधिकृत कागदपत्रांच्या आधारे लिहिले आहे. मी त्यांना सांगितले की, गोळीबाराची सुरुवात निळ्या इंडिका कारमधून झाली होती. हे ऐकताच ते संतापले. सुरुवातीला साधारण दुपारी १२ ते अडीच-तीन वाजेपर्यंत चौकशी तुलनेने शांत होती. त्यानंतर त्यांचा स्वर बदलला. माझ्यावर मानसिक दबाव आणण्याचा प्रयत्न सुरू झाला. जावेद, इशरत जहाँ, आणण्याचा प्रयत्न सुरू झाला. जावेद, इशरत जहाँ, ब्लू इंडिका आणि दोन पाकिस्तानी (अमजद राणा आणि झिशन जोहर) हे अवैधरीत्या भारतात राहत होते. 'सीबीआय'मधील एका अधिकाऱ्याने नंतर मला सांगितले की, चौकशीदरम्यान वारंवार असे बोलले जात होते; हा मद्रासी आहे. त्यांचा उद्देश स्पष्ट होता – माझ्याकडून माझे विधान बदलून घ्यायचे. एका अधिकाऱ्याने म्हटले होते की, 'मैने हमारे सीबीआय डायरेक्टर को प्रॉमिस किया हैं की, मैं ये काली दाढ़ी (अमित शाह) और सफेद दाढ़ी (नरेंद्र मोदी) को अंदर करवाऊंगा.'

**स्मिता प्रकाश :** जर त्यांनी तुमच्यासारख्या एका प्रशासकीय अधिकाऱ्याशी अशी वागणूक केली असेल, तर कर्नल पुरोहित आणि साध्वी प्रज्ञा यांच्यासोबत काय झाले असेल याची कल्पनाच करवत नाही.

**आर.व्ही.एस. मणी :** कर्नल पुरोहित हे लष्करी अधिकारी असल्यामुळे त्यांनी तो शारीरिक आणि मानसिक छळ सहन केला, पण साध्वी प्रज्ञा यांच्यासाठी ते अधिक कठीण होते. त्यांच्या प्रकृतीवर त्याचा गंभीर परिणाम झाला. त्यांच्या डोळ्यांवर परिणाम झाला. शरीराच्या अनेक अवयवांवर त्याचे दुष्परिणाम झाले.

**स्मिता प्रकाश :** म्हणजे हे सर्व 'हिंदू दहशतवाद' हे कथानक सिद्ध करण्यासाठी केले जात होते, असे तुम्हाला वाटते?

**आर.व्ही.एस. मणी :** होय, इतकेच नव्हे; तर त्या काळात नरेंद्र मोदी यांना या कथित 'हिंदू दहशतवाद' कथानकाचे मुख्य सूत्रधार म्हणून दाखवण्याचाही प्रयत्न केला जात होता. इशरत जहाँ प्रकरण... सोहराबुद्दीन प्रकरण... या सर्व घटनांमधून नरेंद्र मोदी यांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न सुरू होता. जून २०१३ दरम्यान नरेंद्र मोदी यांची लोकप्रियता प्रचंड वाढली होती. त्या काळात इतर कोणताही राष्ट्रीय नेता त्यांच्या लोकप्रियतेच्या जवळपास नव्हता. काँग्रेस असो किंवा इतर प्रादेशिक पक्ष; कोणीही त्यांच्याशी स्पर्धा करू शकत नव्हते. म्हणूनच त्यांना वाटत होते की, भविष्यात नरेंद्र मोदी हे देशाचे नेतृत्व करू शकतात. त्यामुळे त्यांना राजकीयदृष्ट्या रोखणे आवश्यक आहे, असा विचार काही लोकांनी केला असावा.

**स्मिता प्रकाश :** त्या काळात लालकृष्ण अडवाणी यांचे नेतृत्व मागे पडत होते. त्यामुळे सुषमा स्वराज, अरुण जेटली आणि नरेंद्र मोदी हीच प्रमुख नावे चर्चेत होती.

**आर.व्ही.एस. मणी :** माझ्या मते नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांना कायदेशीर प्रक्रियेत अडकवून राजकीयदृष्ट्या रोखण्याचा प्रयत्न झाला. नरेंद्र मोदी हे अयोध्येत संपन्न झालेल्या रथयात्रेचे सारथी होते. त्यामुळे अरुण जेटली किंवा सुषमा स्वराज यांच्यापेक्षा नरेंद्र मोदी हे विरोधकांसमोरील मोठे आव्हान होते.

**स्मिता प्रकाश :** त्या काळात तुम्ही कधी नरेंद्र मोदी किंवा अमित शाह यांना भेटला होता का?

**आर.व्ही.एस. मणी :** नाही, त्या काळात मी त्यांना कधीही भेटलो नव्हतो. माझा त्यांच्याशी कोणताही वैयक्तिक संपर्क नव्हता.

**स्मिता प्रकाश :** मग त्यांना तुमच्यावर काय परिस्थिती ओढावली आहे, याची माहिती होती का?

**आर.व्ही.एस. मणी :** माझ्या माहितीनुसार नंतर गुजरात सरकारमधील काही गुजरात सरकारमधील अधिकाऱ्यांमार्फत त्यांच्यापर्यंत माहिती पोहोचली होती, परंतु त्या काळात माझा त्यांच्याशी कोणताही थेट संपर्क नव्हता. त्या काळात माझी नियुक्ती Land Development Officer (LDO) म्हणून झाली होती. त्याचदरम्यान गुजरात सरकारच्या एका निवासी आयुक्तांनी (Resident Commissioner) दिल्लीतील गुजरात भवनासाठी अतिरिक्त जमिनीची मागणी केली. मी संबंधित सर्व्हे अधिकाऱ्यांना बोलावले. त्या जागेची स्थिती, उपलब्धता आणि कायदेशीर बाबी तपासण्याचे निर्देश दिले. मी स्पष्ट सांगितले की, कोणताही निर्णय कायदेशीर प्रक्रियेनुसारच घेतला जाईल. राजकीय दबावाखाली किंवा वैयक्तिक इच्छेनुसार निर्णय घेणे शक्य नव्हते. मी या प्रकरणात कायदा विभागाचे मत (Legal Opinion) मागवले. माझ्या मते अशा संवेदनशील विषयात कायदेशीर मत घेणे आवश्यकच होते.

**(क्रमशः)**



पनवेल : गुरुपौर्णिमेनिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची अनेक मान्यवरांनी सदिच्छा भेट घेतली. विविध क्षेत्रांतील पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी त्यांची भेट घेऊन गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा देत आशीर्वाद घेतले. यावेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, चिटणीस रविनाथ पाटील, महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर, उपमहापौर प्रमिला पाटील, जिप सदस्य कमला देशेकर, पं. स. सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, प्रभाकर जोशी, चंद्रकांत घरत, जीवन गावंड, जितेंद्र घरत, माजी सरपंच गजानन पाटील, सरपंच विजेंद्र म्हात्रे, रूपेश धुमाळ, सीमा घरत, सदाशिव वास्कर, नगरसेवक हॅप्पी सिंग, नगरसेविका दर्शना भोईर, प्रतिभा भोईर, कामगार संघटनेचे जिल्हा अध्यक्ष रवी नाईक, संजय भगत, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, सतीश पाटील, उद्योजक राजू गुप्ते, प्रशांत मोरे, बाळासाहेब कारंडे, मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, अविनाश कुलकर्णी, पत्रकार गणेश कोळी, प्रकाश भगत यांच्यासह अनेक मान्यवरांनी गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा देऊन आशीर्वाद घेतले.

# दिघी ते सुरुर ग्रीनफिल्ड महामार्ग साकारणार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

ग्रीनफिल्ड महामार्गाचा दिघी बंदर–पोलादपूर–सुरुर या १४० किलोमीटर लांबीचा प्रस्ताव राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पुढे आणला आहे. सातारा येथे जोडणारा हा महामार्ग पोलादपूर महाबळेश्वरमार्गे १४० किमी अंतराचा आहे. या हायवेमुळे घाटरस्ता कमी होऊन पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातील मालवाहतूक अधिक जलद होण्यास मदत होणार असल्याचा दावा करण्यात येत आहे.





पुण्यातील औद्योगिक पट्ट्याला मुंबई–बंगळुरू महामार्गाद्वारे दिघी बंदराशी थेट जोडले जाईल. प्रकल्पात डोंगराळ भागामुळे भुयारी मार्ग आणि पुलांचे बांधकाम प्रस्तावित आहे. आठ पदरी प्रस्तावित महामार्गासाठी थेट भूसंपादनाचा विचार असल्याचे सांगण्यात आले. पुढील काही महिन्यात या महामार्गाच्या विस्तृत प्रकल्प अहवाल निविदा उघडल्या जाणार असण्याची शक्यता आहे.

दिघी बंदरापासून पोलादपूरमार्गे महाबळेश्वर असा ग्रीनफिल्ड महामार्गाच्या निर्मितीचा प्रस्ताव सुरू आहे. अलिकडेच पोलादपूर तालुक्यातील भुमिपुत्र प्रवीण दरेकर यांनी केंद्रीय भुपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्या भेटीनंतर दापोली ते पोलादपूरमार्गे महाबळेश्वर या रस्त्याला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा मिळण्यासाठी आग्रही असल्याचे सांगितले होते.

पोलादपूर काटेतळीमार्गे विन्हेरे या रस्त्याचा उपयोग या ग्रीनफिल्ड महामार्गामध्ये होणार आहे. याशिवाय आंबेनळी घाटदेखील ग्रीनफिल्ड महामार्गामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे. मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ला कशेडी घाटापूर्वीच हा आंबेनळी घाटमार्गे पोलादपूर येथून वाई सुरुरपर्यंत रस्ता असेल.

# साळावमध्ये विविध विकासकामांचे लोकार्पण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील साळावमध्ये जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत सात लाख रुपये खर्चाने जि.प. शाळा नूतनीकरण व दुरूस्ती तसेच जनसुविधा योजनेंतर्गत पाच लाख रुपये खर्चातून गावातील अंतर्गत रस्ता करणे या कामांचे लोकार्पण उत्साहात झाले. ही कामे भाजपचे दक्षिण जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते व महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष ॲड. मनस्वी मोहिते यांच्या प्रयत्नातून करण्यात आली आहेत.

लोकार्पण सोहळयास ॲड. मोहिते दाम्पत्यासह मिठेखार ग्रा.प.सरपंच अशोक वाघमारे, साळाव सरपंच वैभव कांबळी, ग्रा.प.सदस्य शीतल वाणी, कार्यकर्ते महेंद्र चौलकर, लियाकत खोत, राजेंद्र सुतार, संदीप चिरायू, विनायक कांबळी, भरत जोशी, प्रशांत भोय, निलेश चवरकर, गणेश कट, हरेश पाटील, भारत सावंत, ओदश माळी, नितीन आर्डे, दीपक चोरडेकर, सागर पाटील तसेच शिक्षक, ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांनी ॲड. मोहिते यांचे आभार मानले.



# बारशिव येथे बांबू कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा

**माणगाव : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील महिला आणि युवकांना कौशल्याधारित प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (बाटू) संचालित बांबू कौशल्य आणि संशोधन केंद्राच्या वतीने मुरूड तालुक्यातील बारशिव येथील राधाकृष्ण मंदिरात आयोजित बांबू प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या कार्यशाळेला विशेषतः महिला व तरुणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून एकूण १५ प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला.



या कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभास बारशिवचे सरपंच हर्षद संजय महाडिक, उपसरपंच प्रसाद चौलकर, प्रा. तेजस महागावकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी ग्रामीण भागातील महिलांना आणि युवकांना रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात करण्यासाठी अशा प्रशिक्षण उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली. बांबू आधारित उद्योग हा पर्यावरणपूरक असून कमी भांडवलात सुरू करता येणारा व्यवसाय असल्याने स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मितीसाठी तो प्रभावी ठरू शकतो, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यशाळेला सुरेश धारवा आणि प्रवीण मावस्कर यांनी प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले. त्यांनी बांबू प्रक्रिया, हस्तकला निर्मिती, उत्पादनाची गुणवत्ता, विपणनाच्या संधी आणि स्वयंरोजगाराच्या विविध पैलूंवर सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन बांबू कौशल्य आणि संशोधन केंद्राचे व्यवस्थापक श्रीनिवास वारखंडकर यांनी प्रभावीपणे केले.

**स्वयंरोजगाराची महिलांना संधी**

दिवसभर चाललेल्या या प्रशिक्षणामध्ये सहभागी महिलांना बांबूपासून आकर्षक राखी आणि कानातले तयार करण्याचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थींनी स्वतः विविध आकर्षक हस्तकला वस्तू तयार करत बांबू कलाकुसरीतील बारकावे शिकून घेतले. या प्रशिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढल्याचे तसेच भविष्यात स्वतःचा छोटा उद्योग सुरू करण्याची प्रेरणा मिळाल्याच्या भावना सहभागी महिलांनी व्यक्त केल्या.

# कबड्डीपटूंना स्थानिक प्रकल्पांमध्ये नोकरी मिळाली पाहिजे –अभिजित राणे

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड ही कबड्डीची पंढरी म्हणून ओळखली जाते. रायगडची ओळख कायम राहिली पाहिजे. त्यासाठी खेळाडूंना सुविधा दिल्या पाहिजेत. स्थानिक प्रकल्पांमध्ये रायगड जिल्ह्यातील कबड्डी खेळाडूंना नोकरी मिळावी यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत, असे विचार आवास ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा रणजीत राणे क्रीडा व सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष अभिजित राणे यांनी व्यक्त केले.



अभिजित राणे यांनी कबड्डी खेळीसाठी दिलेल्या योगदानाची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने त्यांना कृतज्ञता पुरस्कार २०२६ देऊन गौरवले. त्याबद्दल मंगळवारी (दि. २८) कबड्डी ग्रुपतर्फे अभिजित राणे यांचा आवास येथे सत्कार करण्यात आला. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

रायगड जिल्हयात कबड्डीच्या विकासासाठी आम्ही मदत करू. कबड्डीच्या कोणत्याही कार्यक्रमाची जबाबदारी आमच्यावर सोपवली, तर आवास ग्रामस्थ सहकार्य करतील, असे आश्वासन राणे यांनी यावेळी दिले.

कार्यक्रमास कबड्डी ग्रुपचे जे.जे. पाटील, प्रमोद म्हात्रे, हिराचंद परितल, गजानन मोकल, नरेश म्हात्रे, अजिंक्य पाटील, राजू समजिसकर, सुनील पाटील, बा.ना. हायस्कूलचे मुख्याधापक अनिल दारकुंडे, आवास ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच सुधीर राऊळ आदी उपस्थित होते.

# हरित अंगणवाडी उपक्रमांतर्गत वृक्षदिंडी व वृक्षारोपण

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील काशीद ग्रामपंचायत हद्दीत चिकणी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच स्व. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त हरित आरोग्य, हरित अंगणवाडी विशेष वृक्ष लागवड व संगोपन या निमित्ताने दिंडीचे आयोजन अंगणवाडी केंद्र येथे करण्यात आले होते.



वृक्षदिंडीत लहान बालके, अंगणवाडी सेविका, मदतनीस, पालक तसेच ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारे फलक आणि जनजागृतीद्वारे वृक्षलागवडीचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहचविण्यात आले.

यावेळी रायगड जिल्हा परिषद महिला बालकल्याण समिती सभापती रसिका केणी व जिल्हा परिषद सदस्य मानसी दळवी यांच्या हस्ते शाळेतील प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमास मुरूड तालुका बांधकाम संघटनेचे अध्यक्ष दिनेश मिनमिने, उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचिक, जिल्हा परिषद सदस्य ज्योती नागावकर, मुरूड पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ, पंचायत समिती उपसभापती अश्विनी जंगम, सदस्य अश्विनी डोंगरीकर, सदस्य गणेश नाती, गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ, बालविकास प्रकल्प अधिकारी संजय शेडगे, सहाय्यक गटविकास अधिकारी मंगेश पाटील, पर्यवेक्षिका दिनेश वारगे, काशीद सरपंच संतोष राणे, शिक्षक, विद्यार्थी, अंगणवाडी केंद्र आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हा परिषद सभापती रसिका केणी, सदस्य मानसी दळवी यांच्या हस्ते शाळेत जाणाऱ्या मुलींना सायकल वाटप, गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले तसेच पंचायत समिती मुरुड सेस फंड २०२५–२६मधून अंगणवाडी सेविकांना स्टील ट्रॉली, कुकर, साहित्याचे वाटप करण्यात आले.

# युवक बेपत्ता

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे कुंभारआळी येथील युवराज यशवंत मगर (वय ३५) हे कामावर जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडले, मात्र त्यानंतर परत न आल्याने पत्नीने पती हरवल्याची तक्रार नागोठणे पोलीस ठाण्यात दिली आहे.

बेपत्ता युवराज मगर यांचा रंग सावळा असून उंची सुमारे १६४ सेंमी, केस काळे व चेहरा उभट आहे, तर अंगात खाकी रंगाची फुल पँट, निळ्या रंगाचा हाफ शर्ट, पायात चप्पल आहे. या व्यक्तीबाबत कोणाला कोणतीही माहिती मिळाल्यास त्यांनी नागोठणे पोलीस ठाणे (८०१००७६८७८) येथे तत्काळ संपर्क साधावा.

# खोपोली पोलीस ठाण्याला तीन लॅपटॉपचे वितरण



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली पोलीस ठाण्याच्या वाढत्या कामकाजाची गरज लक्षात घेऊन गार्गी ह्युटनेस इंडस्ट्रीज आणि लायन्स क्लब खोपोली यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस ठाण्याला तीन आधुनिक लॅपटॉप भेट देण्यात आले. गार्गी ह्युटनेस इंडस्ट्रीजच्या सीएसआर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) निधीतून या लॅपटॉपचे वितरण करण्यात आले.

खोपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीतून मुंबई–पुणे राष्ट्रीय महामार्ग तसेच मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग हे दोन महत्त्वाचे मार्ग जात असल्याने या परिसरात अपघात, चोरीसह विविध गुन्हे व कायदा–सुव्यवस्थेची प्रकरणे सातत्याने घडत असतात. याशिवाय पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात मोठी औद्योगिक वसाहत असून विविध राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमही नियमितपणे आयोजित केले जातात. त्यामुळे पोलीस प्रशासनावर मोठा कामाचा ताण असतो.या पार्श्वभूमीवर आधुनिक तंत्रज्ञानाची साथ मिळावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

लॅपटॉप वितरण कार्यक्रमाला पोलीस निरीक्षक सचिन हिरे, गार्गी ह्युटनेस इंडस्ट्रीजचे अधिकारी अतुल वदडकर, रावसाहेब सुर्वे, सुग्रीव यादव, लायन्स क्लब खोपोलीचे शैली मेहता, एकता भादोरिया यांसोबत खोपोली पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी पोलीस अधिकाऱ्यांनी गार्गी ह्युटनेस इंडस्ट्रीज आणि लायन्स क्लब खोपोली यांचे आभार मानले. या आधुनिक लॅपटॉपच्या माध्यमातून पोलीस ठाण्यातील दैनंदिन प्रशासकीय कामकाज, माहितीची नोंद, तपास प्रक्रिया आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांमध्ये अधिक वेग, अचूकता आणि कार्यक्षमता येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# टास्क फोर्स कर्जत विभागातर्फे प्रशिक्षण व आरोग्य शिबिर



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील बार्डी येथे लाईट ऑफ लाइफ ट्रस्टच्या टास्क फोर्स विभागामार्फत सदस्यांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आरोग्य शिबिरही घेण्यात आले.

टास्कफोर्स रिजनल अध्यक्ष साहिल कदम यांनी प्रास्ताविक करून प्रशिक्षण शिबिराचा उद्देश स्पष्ट केला. त्यानंतर आनंदो प्लस प्रकल्प समन्वयक दशरथ देशमुख आणि टास्कफोर्स रिजनलच्या उपाध्यक्ष दीक्षिता गोगटे यांनी, 'स्वतःची ओळख, स्वप्ने, ध्येय आणि सामाजिक जबाबदारी' या विषयावर विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहिली सेंटरच्या सहाय्यक सेंटर प्रमुख दीक्षा सोनावणे यांनी केले.

प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा या उद्देशाने बार्डी गावात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. टास्क फोर्स सदस्यांनी स्वच्छता, शिक्षण आणि व्यसनमुक्ती या विषयांवर रॅली काढून ग्रामस्थांमध्ये सामाजिक जागरूकता निर्माण केली. याचबरोबर ग्रामस्थांसाठी मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली आणि रुग्णांना गरजेनुसार गोळया आणि औषधे देण्यात आल्या तसेच नेत्रतपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्याचा नागरिकांनी लाभ घेतला. याशिवाय शंभर ग्रामस्थांचे आयुष्यमान भारत कार्ड तयार करून देण्यात आले. या सर्व उपक्रमांमध्ये कर्जत विभागातील टास्क फोर्सचे ४५ सदस्य सक्रियपणे सहभागी झाले होते.

उपक्रमास डॉ. बन्सीलाल पाटील, पियुष ऑप्टिकल अँड कॉन्टॅक्ट लेन्स सेंटरचे महेश गुप्ता, अर्जुन इंटरप्राईजेसचे अर्जुन लाड यांचे सहकार्य लाभले. यावेळी पंकज कांबळे, पौर्णिमा कांबरी, वैभवी विरले, प्रांजल कांबरी, प्रथमेश ठाकरे, आदित्य ठोंबरे आदी उपस्थित होते.

# आणीबाणी विषयावरील निबंध स्पर्धेत रत्नाकर पाटील, तर वक्तृत्व स्पर्धेत सानिका घरत प्रथम

**अलिबाग : प्रतिनिधी**

भाजप दक्षिण रायगड जिल्ह्यातर्फे आयोजित आणीबाणीविरोधी जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत रत्नाकर पाटील यांनी, तर वक्तृत्व स्पर्धेत सानिका घरत यांनी प्रथम क्रमांक मिळवला.

अलिबागच्या हॉटेल रविकिरण येथे झालेल्या समारंभात विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. भाजप शहराध्यक्ष राजेश प्रधान यांच्या पुढाकाराने आयोजित काव्यस्पर्धेतील विजेत्यांचाही गौरव करण्यात आला.

भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या, आमदार संजय केळकर व विक्रांत पाटील, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी खासदार धैर्यशील पाटील, जिल्हा परिषदेचे कृषी सभापती वैकुंठ पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष डॉ. चित्रा पाटील, भाजप जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, नगरसेवक ॲड. अंकित बंगेरा, संजय पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, उपस्थित होते. सूत्रसंचालन गिरीश तुळपुळे यांनी केले.

**स्पर्धेचा निकाल**

निबंध : प्रथम क्रमांक ॲड. रत्नाकर सखाराम पाटील, द्वितीय जयराम गजानन पाटील, तृतीय विभागून रितिका बेलोस्कर आणि प्रथा मंगेश राऊत. उत्तेजनार्थ सुलभा अरुण बेलोस्कर, श्रेया लालासाहेब तोडकर, प्रथा रत्नाकर पाटील; वक्तृत्व : प्रथम क्रमांक प्रा. सानिका शरद घरत, द्वितीय शुभम बाळासाहेब खरात, तृतीय सृष्टी सचिन सुकाळे, उत्तेजनार्थ श्रुती रमेश राव.

# माणगाव नगरपंचायत अग्निशमन दलाचा सन्मान



**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या फ्रेंड्स ग्रुप महाडतर्फे संस्थेचे संस्थापक सदस्य माजी आमदार कै. माणिकराव जगताप यांच्या जयंतीनिमित्त माणगाव नगरपंचायत अग्निशमन दलाचा आकर्षक सन्मानचिन्ह देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

महाड शहरातील संजय ऑइल ट्रेडींग कंपनीच्या गोदामाला २८ मे २०२६ रोजी लागलेल्या भीषण अग्नीप्रलयाप्रसंगी माणगाव नगरपंचायतीच्या फायर टिममधील अधिकारी व कर्मचारी यांनी सुमारे ११ तासांच्या अथक प्रयत्नांनी ही आग आटोक्यात आणली होती. संकटाच्या ज्वालांमध्ये धैर्याने सामना करीत या टिमच्या जवानांनी असंख्य जीवांचे रक्षण करीत निःस्वार्थी कामगिरी बजावली. याबद्दल फायर टीमच्या बहाद्दर जवानांचा गौरव म्हणून फ्रेंड्स ग्रुप महाडने यथोचित सन्मान केला, जो फायरमन सारंग कनोजे, मुकादम प्रकाश मोरे, कर्मचारी महेंद्र मोरे व दिनेश मोरे यांनी स्वीकारला.




**चौक : रायगड जिल्हा परिषद शाळा गारमाळ येथील लहान मुलांनी आषाढी एकादशीनिमित्ताने वारकरी वेषभूषा परिधान करून दिंडी काढली. विद्यार्थ्यांनी संतांच्या, विठ्ठल रुख्मिणी यांच्या रूपात दिंडी काढली. चिमुकल्यांनी काढलेल्या दिंडीत ग्रामस्थांनीही सहभाग घेतला होता. टाळ, मृदंगाच्या गजरात ज्ञानोबा तुकारामाचा जयघोष करीत निघालेल्या या दिंडीमुळे शाळेच्या परिसरासह गारमाळ गाव भक्तिमय झाला होता.**

## आयसीसी क्रमवारीत भारतीय फलंदाजांचा दबदबा

# शुबमन गिल, ईशान किशन नंबर १

**दुबई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) जारी केलेल्या फलंदाजांच्या ताज्या क्रमवारीत भारतीय खेळाडूंचे वर्चस्व दिसून आले आहे. वनडे आणि कसोटी संघाचा कर्णधार शुबमन गिल आता न्यूझीलंडच्या डॅरिल मिशेलला मागे टाकून वनडे रँकिंगमध्ये अव्वल स्थानी पोहचला आहे. याशिवाय टी-२० क्रमवारीत भारताचा डावखुरा सलामीवीर ईशान किशन अव्वल स्थानावर कायम आहे.

भारतीय वनडे आणि कसोटी संघाचा कर्णधार शुबमन गिलने आतापर्यंत दोन्ही फॉरमॅटमध्ये दमदार कामगिरी केली आहे. न्यूझीलंडचा फलंदाज डॅरिल मिशेल एकही सामना न खेळण्याचा फायदा गिलला झाला आहे. तो ८०१ रेटिंग पॉईंट्ससह वनडे रँकिंगमध्ये अव्वल स्थानी पोहचला आहे.



भारतीय फलंदाजी क्रमातील टॉप ३ फलंदाज हे आयसीसीच्या वनडे रँकिंगमध्ये टॉप ५मध्ये आहेत. विराट कोहली ७६७ रेटिंग पॉईंट्ससह या रँकिंगमध्ये तिसऱ्या स्थानी आहे, तर रोहित शर्मा हा ७५८ रेटिंग पॉईंट्ससह चौथ्या स्थानी आहे. काही महिन्यांपूर्वी रोहितदेखील अव्वल स्थानी कब्जा केला होता.

टी-२० क्रमवारीत भारताचा डावखुरा सलामीवीर ईशान किशन अव्वल स्थानावर कायम आहे. झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात त्याने ८१ धावांची शानदार खेळी केली होती. त्या कामगिरीनंतर त्याने ९१६ रेटिंग गुणांसह कारकिर्दीतील सर्वोच्च रेटिंग गाठली होती. ही टी-२० इतिहासातील तिसरी सर्वोत्तम फलंदाजी रेटिंग ठरली. मालिका संपल्यानंतर ईशानचे रेटिंग गुण ९१० झाले असले, तरी तो दुसऱ्या क्रमांकावरील साहिबजादा फरहान (८४८) याच्यापेक्षा मोठ्या फरकाने आघाडीवर आहे.

आयर्लंड आणि इंग्लंडमधील मालिकेतील पराभवानंतर भारतीय संघाने नंबर वनचा ताज गमावला होता. आता झिम्बाब्वेला व्हाईटवॉश देत टीम इंडिया पुन्हा एकदा अव्वलस्थानी पोहचली आहे. ६१ सामन्यातील १६३५५ पॉंट्ससह २६८ रेटिंगसह टीम इंडिया नंबर वन बनली आहे.

### वैभव सूर्यवंशीची मोठी झेप!

क्रिकेट जगतातील १५ वर्षीय 'वंडर बॉय' वैभव सूर्यवंशीने पुरुष टी-२०तील आयसीसीच्या फलंदाजांच्या क्रमवारीत मोठी झेप घेतली आहे. झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेत धमाकेदार कामगिरीसह भारताचा युवा सलामीवीर क्रमवारीत २३० स्थानांनी झेप घेत इतिहास रचला आहे. हरारे येथे झिम्बाब्वेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या मालिकेत त्याने ५०.३३च्या सरासरीने १५१ धावांच्या जोरावर मालिकावीर पुरस्कार पटकवला होता. या कामगिरीचा त्याला क्रमवारीतही मोठा फायदा झाल्याचे दिसते. अवघ्या १५व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सहा सामन्यानंतर वैभव सूर्यवंशी २३० स्थानांची झेप घेत टी-२०मधील फलंदाजांच्या क्रमवारीत ४८व्या स्थानी विराजमान झाला आहे. ही त्याच्या कारकिर्दीतील आतापर्यंतची सर्वोत्तम रँकिंग आहे.



## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या फुटबॉल टीमने जिंकला सुब्रोतो कप

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेतर्फे १७ वर्षाखालील मुलांसाठी जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे करण्यात आले होते. यजमान शाळेच्या संघाने विजेतेपद पटकावून सुब्रोतो कप जिंकला.

या स्पर्धेत अनेक शाळांतील विद्यार्थ्यांच्या संघांनी सहभाग घेतला होता. रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या संघाने सेमीफायनलमध्ये बालभारती स्कूल खारघर या संघास २-० या फरकाने नमवून अंतिम फेरीत प्रवेश केला, तर अंतिम फेरीतील सामन्यात रेयान स्कूल खारघरचा ४-२ गोलच्या फरकाने पराभूत करून सुब्रोतो कपवर आपले नाव कोरले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन, लोकनेते रामशेठ ठाकूर, शाळेच्या मुख्याध्यापिक राज अलोनी यांनी यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे अपूर्व अगरवाल यांचे कौतुक करून अभिनंदन केले.








## राष्ट्रीय मास्टर पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडचे यश

### रामचंद्र गावडे यांचा पदकांचा 'चौकार'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

औरंगाबाद येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी विविध पदके जिंकून यश प्राप्त केले आहे.

यामध्ये रामचंद्र सखाराम गावडे (पनवेल) यांनी ८३ किलो वजनी गटात मास्टर-३ (साठ वर्षावरील) गटात चार पदके पटकाविली. त्यांनी डेडलिफ्टमध्ये रौप्य, स्कॉट, बेंचप्रेससह संपूर्ण स्पर्धेत कांस्य अशी एकूण चार पदके जिंकली. याशिवाय मास्टर-२ (पन्नास वर्षावरील) गटात ६६ किलो वजनी गटात महेश कृष्णा पाटील (वावोशी-खोपोली)यांनीसुद्धा स्कॉट आणि डेडलिफ्ट या प्रकारात कांस्यपदक मिळवले. मास्टर-४ (सत्तर वर्षावरील) गटात ज्येष्ठ खेळाडू रमेश खरे (हनुमान व्यायामशाळा, पेण) यांनी बेंचप्रेस प्रकारात कांस्यपदक मिळविले.

या सर्व मास्टर खेळाडूंनी केलेल्या कामगिरीबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीश वेदक, सचिव अरुण पाटकर आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

## 'राष्ट्रकुल'मध्ये हरजिंदर, गुलवीरला रौप्यपदक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी आणखी दोन रौप्यपदकांची भर घालत देशाची पदकसंख्या १२वर नेली. वेटलिफ्टिंगमध्ये हरजिंदर कौर आणि ॲथलेटिक्समध्ये गुलवीर सिंह यांनी शानदार कामगिरी करत भारताला प्रत्येकी एक रौप्यपदक मिळवून दिले.

महिलांच्या ६९ किलो वजनी गटातील वेटलिफ्टिंग स्पर्धेत हरजिंदर कौर हिने एकूण २२७ किलो वजन उचलत रौप्यपदकावर नाव कोरले. तिच्या दमदार कामगिरीमुळे भारताच्या पदकतालिकेत आणखी एका मौल्यवान पदकाची भर पडली. यानंतर ॲथलेटिक्समध्ये पुरुषांच्या १०,००० मीटर शर्यतीत गुलवीर सिंह याने उत्कृष्ट धाव घेत रौप्यपदक पटकावले. संपूर्ण शर्यतीत त्याने सातत्यपूर्ण वेग राखत भारताला दिवसातील दुसरे रौप्य मिळवून दिले.

## अखिल भारतीय पोलीस क्रीडा स्पर्धेत तृप्ती सिनलकरला कांस्यपदक




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

हैदराबाद येथे आयोजित ११व्या अखिल भारतीय पोलीस ज्युडो क्लस्टर स्पर्धा अंतर्गत झालेल्या तायक्वांदो क्रीडा प्रकारात महिलांच्या ६७ किलोखालील वजनी गटात महाराष्ट्र पोलीस दलातील खेळाडू तृप्ती तुषार सिनलकर यांनी कांस्यपदक पटकावले.

या स्पर्धेत संपूर्ण देशातील राज्य व राष्ट्रीय पोलीस दल सहभागी झाले होते. यातील विजेते खेळाडू ऑस्ट्रेलियात पुढील वर्षी होणाऱ्या जागतिक पोलीस आणि फायर क्रीडा स्पर्धेसाठी पात्र होणार आहेत.

स्पर्धेदरम्यान दुखापत झाल्यानंतरही तृप्ती सिनलकर यांनी हार न मानता जिद्द, चिकाटी आणि लढाऊ वृत्तीच्या जोरावर आपली लढत सुरू ठेवत कांस्यपदक जिंकले.

याचबरोबर पुणे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात झालेल्या पाचव्या इंडिया तायक्वांदो पुमसे राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७मध्ये तृप्ती सिनलकर, नुपूर पावगे आणि समृद्धी कापसे यांनी ३० वर्षांखालील महिला सांघिक पुमसे गटात कांस्यपदक प्राप्त केले होते.

या दुहेरी यशाबद्दल गुरुकुल तायक्वांदो अकॅडमीचे संस्थापक, आंतरराष्ट्रीय पंच आणि महाराष्ट्र पोलीस तायक्वांदो संघाचे प्रशिक्षक तुषार सिनलकर, अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक रोहित सिनलकर, सहाय्यक प्रशिक्षक प्रेम पाटणे यांच्यासह महाराष्ट्र विशेषतः नवी मुंबई पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तृप्ती सिनलकर यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## नेमबाजी विश्वचषकात सोनम, हिमांशूला कांस्यपदक

**हाँगझोऊ : वृत्तसंस्था**

चीनमधील हाँगझोऊ येथे सुरू असलेल्या आयएसएसएफ विश्वचषकात भारतीय रायफल नेमबाज सोनम उत्तम मस्कर आणि हिमांशू ढिल्लन यांनी १० मीटर एअर रायफल मिश्र सांघिक प्रकारात कांस्यपदक पटकावले आणि भारताच्या पदकांच्या यादीत आणखी एका यशाची भर घातली.

पात्रता फेरीत दोन्ही भारतीय संघांनी दमदार कामगिरी करत अंतिम फेरी गाठली होती. सोनम उत्तम मस्कर (३१७.२) आणि हिमांशू ढिल्लन (३१७.४) यांनी एकत्रितपणे ६३४.६ गुणांची पात्रता धावसंख्या नोंदवली. त्याचवेळी एलावेनिल वलारिवन (३१६.८) आणि पार्थ राकेश माने (३१७.४) यांच्या जोडीने







६३४.२ गुणांसह त्यांच्या पाठोपाठ पात्रता मिळवली. अंतिम फेरीत सोनम आणि हिमांशू यांनी संयमित कामगिरी करत एकूण ४४१.२ गुण (प्रत्येकी २२०.६) मिळवले आणि चीन १ व चीन २ या संघांच्या मागे राहत कांस्यपदक निश्चित केले. एलावेनिल आणि पार्थ ३७८.८ गुणांसह (एलावेनिलः १९०.५, पार्थः १८८.३) चौथ्या स्थानावर राहिले.

## विंडीज-पाक कसोटी सामन्यात विकेट्सचा महाविक्रम

### तिघांचा 'पंच'

**त्रिनिदाद : वृत्तसंस्था**

पहिल्या कसोटी सामन्यात वेस्ट इंडिजच्या संघाने पाहुण्या पाकिस्तानला ९० धावांनी पराभूत केले. या कसोटी सामन्यात कसोटी क्रिकेटमध्ये अविश्वसनीय विक्रमाची नोंद झाली. चार डावात सर्वच्या सर्व ४० विकेट्स या जलदगती गोलंदाजांनी घेतल्या. कसोटी क्रिकेटच्या १४९ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच कॅरेबियन मैदानात अनोखा विक्रम प्रस्थापित झाल्याचे पाहायला मिळाले.

यजमान संघातील युवा गोलंदाज जेडेन सील्स आणि जास्टिन ग्रीव्स यांच्या भेदक माऱ्यासमोर पाहुण्या संघाची अक्षरशः भंबेरी उडाली. दुसरीकडे पाकिस्तानच्या ताफ्यातील अनुभवी जलदगती




गोलंदाज मोहम्मद अब्बासने स्विंगची जादू दाखवली. या तिघांनी पाच विकेट्स हॉलसह खास विक्रमांना गवसणी घातली. जस्टिन ग्रीव्सने पाकिस्तानच्या पहिल्या डावात २७ धावा खर्च करताना पाच विकेट्स घेतल्या. कमालीची गोष्ट म्हणजे पाच निर्धाव षटके टाकताना त्याने पाच विकेट्सचा डाव साधत इतिहास रचला. पाकच्या मोहम्मद अब्बासने दुसऱ्या डावात २२ धावांत वेस्ट इंडिजचा अर्धा संघ तंबूत धाडला. अखेरच्या डावात जेडेन सील्सने १८ धावा खर्च करत पाच विकेट्स घेत संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

वेस्ट इंडिजच्या संघाने पहिल्या डावात ३११ धावा केल्यावर पाकिस्तानचा संघ पहिल्या डावात २८२ धावांवर आटोपला. २९ धावांची अल्प आघाडी मिळवणाऱ्या वेस्ट इंडिजचा दुसरा डाव अवघ्या १८१ धावांत आटोला. पाकिस्तानला २११ धावांचे टार्गेट मिळाले, पण या धावसंख्येचा पाठलाग करताना ते १२० धावांत आटोपले अन् यजमानांनी ९० धावांनी विजय नोंदवत दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

पुन्हा एकदा पाकिस्तान संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी मिळालेल्या बाबर आझमला पहिल्या डावात छाप सोडता आली नव्हती. दुसऱ्या डावात त्याने संयमी खेळी करताना अर्धशतक झळकावले. १०७ चेंडूचा सामना करताना त्याने नऊ चौकाराच्या मदतीने ५८ धावा केल्या. एका बाजूला शेवटपर्यंत मैदानात उभा राहिला, पण दुसऱ्या बाजूने एकानेही त्याला साथ दिली नाही.

## रोहित, विराटमध्ये खूप क्रिकेट शिल्लक -जहीर अब्बास

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने आगामी वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धेची तयारी सुरु केली आहे. या स्पर्धेत शुबमन गिल भारतीय संघाचे नेतृत्व करेल, पण विराट कोहली आणि रोहित शर्माच्या खेळण्यावर अजूनही प्रश्नचिन्ह आहे. दरम्यान, पाकिस्तानचे माजी कर्णधार जहीर अब्बास यांनी विराट आणि रोहित यांच्या वर्ल्डकप खेळण्याबाबत मोठे वक्तव्य केले आहे.

एका पाकिस्तानी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बोलताना अब्बास म्हणाले, रोहित आणि विराट दोघेही भारतीय क्रिकेटमधील दिग्गज फलंदाज आहेत. त्यांच्या वर्ल्डकप खेळण्याचा मार्गात वय आडवे येऊ नये. या दोघांच्या कौशल्याची तुलनाच करता येणार नाही तसेच त्यांचा अनुभव पाहता त्यांना वर्ल्डकप संघातून बाहेर ठेवण्याचे कारणच नाही.

आगामी वनडे वर्ल्डकप स्पर्धेचा थरार हा दक्षिण आफ्रिका, नामिबिया आणि झिम्बाब्वेत रंगणार आहे. दोघांनाही भारतीय संघाकडून खेळण्याचा दांडगा अनुभव आहे. त्यामुळे हे अनुभवी खेळाडू संघात असल्यामुळे भारतीय संघाचा फायदाच होईल, असे अब्बास यांनी नमूद केले.

## गुकेश-सिंदारोव्ह यांच्यात जिनिव्हामध्ये रंगणार बुद्धिबळ अजिंक्यपदाची लढत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विद्यमान जागतिक विजेता गुकेश डी आणि आव्हानवीर जावोखिर सिंदारोव्ह यांच्यातील २०२६ची जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धा स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे २५ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत होणार असल्याचे जागतिक बुद्धिबळ महासंघाने (फिडे) जाहीर केले. स्पर्धा सुरू होईल तेव्हा दोन्ही बुद्धिबळपटू २० वर्षांचे असतील, ज्यामुळे ही इतिहासातील सर्वात तरुण वयोगटातील जागतिक अजिंक्यपद लढत ठरेल.



गुकेश डिसेंबर २०२४मध्ये सिंगापूर येथे जिंकलेले विजेतेपद या स्पर्धेत पणाला लावेल. त्याने चीनच्या डिंग लिरेनचा १४व्या आणि अंतिम 'क्लासिकल' सामन्यात पराभव करून १८वा जागतिक विजेता आणि हे विजेतेपद पटकावणारा सर्वात तरुण बुद्धिबळपटू होण्याचा मान मिळवला होता. सायप्रसमध्ये झालेली फिडे कँडिडेट्स टूर्नामेंट २०२६ जिंकून सिंदारोव्हने या विजेतेपदासाठी आपली दावेदारी सिद्ध केली. २०२५च्या फिडे वर्ल्डकपमधील विजयानंतर या उझबेक ग्रँडमास्टरने एक फेरी बाकी असतानाच स्पर्धेत पहिले स्थान निश्चित केले.

अजिंक्यपद स्पर्धेत १४ 'क्लासिकल' सामने होतील. जो खेळाडू सर्वप्रथम सात गुण मिळवेल, त्याला विजेता घोषित केले जाईल आणि एकदा गुणसंख्या गाठली गेली की पुढील सामने खेळले जाणार नाहीत. सर्व १४ सामन्यांनंतर गुण समान राहिले, तर विजेत्याचा निर्णय 'टाय-ब्रेक'द्वारे घेतला जाईल.

## फुटबॉल मैदानावर दिसणार 'टायगर'चा जलवा

### ड्युरंड कपमध्ये अभिनेता श्रॉफ खेळणार

**मुंबई : प्रतिनिधी**

बॉलीवूड अभिनेता टायगर श्रॉफ आता फुटबॉल मैदानावरही खेळताना दिसेल. १३५व्या ड्युरंड कप फुटबॉलसाठी मुंबई एफसीने ३६ वर्षीय अभिनेत्याचा आपल्या संघात समावेश केला.



मुंबई एफसीचे तांत्रिक संचालक झोहेब खान यांनी सांगितले की, ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ यांचा मुलगा असलेला टायगर श्रॉफ सध्या संघासोबत नियमित सराव करत असून त्याच्या फुटबॉल खेळण्याच्या क्षमतेने क्लबला खूप प्रभावित केले आहे. ते म्हणाले की, टायगरला खेळाची चांगली तांत्रिक समज आहे. त्याला स्लाइड टॅकल, वन-ऑन-वन ड्रिबलिंग तसेच आक्रमक खेळण्याच्या शैलीत विशेष रस आहे.

झोहेब खान यांच्यानुसार त्यांनी पहिल्यांदा २०२३मध्ये एका इन्फ्लुएन्सर्स फुटबॉल लीगदरम्यान टायगर श्रॉफचा खेळ पाहिला. त्याच्या गुणवत्तेने प्रभावित होऊन क्लबची स्थापना झाल्यानंतर २०२४मध्ये त्याला सराव सत्रात सहभागी होण्याचे आमंत्रण दिले. एक दिवस टायगरने स्वतः व्यावसायिक सामना खेळण्याची इच्छा व्यक्त केली. त्याला आम्ही ड्युरंड कप संघात स्थान देण्याची योजना आखली, मात्र क्लबसमोरील सर्वांत मोठे आव्हान सुरक्षेचे आहे. ड्युरंड कपमध्ये मुंबई एफसी ३ ऑगस्ट रोजी शिलाँग येथील जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर लांगस्निंग एफसीविरुद्ध सलामीला खेळेल.

## सुभदीप घोष टीम इंडियाचे नवे फिल्डिंग कोच



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाच्या कोचिंग स्टाफमध्ये मोठा बदल करण्यात आला आहे. असिस्टंट कोच रेयान टेन डोएशेट यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर अवघ्या काही तासांत आणखी एक मोठा निर्णय समोर आला आहे. फिल्डिंग कोच टी दिलीप यांचा करार इंग्लंड दौऱ्यानंतर संपुष्टात आला असून बीसीसीआयने त्यांच्या जागी सुभदीप घोष यांची नियुक्ती केली आहे.

माध्यमांतील वृत्तानुसार सुभदीप घोष ऑगस्टमध्ये सुरू होणाऱ्या श्रीलंका दौऱ्यापासून टीम इंडियासोबत काम सुरू करणार आहेत. त्यांचा कार्यकाळ २०२७च्या एकदिवसीय विश्वचषकापर्यंत असणार आहे. श्रीलंका दौऱ्यात भारत दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे.

आसामचे रहिवासी असलेले सुभदीप घोष यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळले नसले तरी प्रशिक्षक म्हणून त्यांच्याकडे मोठा अनुभव आहे. ते यापूर्वी भारतीय महिला संघ आणि भारतीय १९ वर्षांखालील संघाचे फिल्डिंग कोच राहिले आहेत. यावर्षी भारतीय अंडर-१९ संघाने विश्वचषक जिंकला, त्यावेळीही ते संघाच्या कोचिंग स्टाफचा महत्त्वाचा भाग होते. घोष यांनी इंडियन प्रीमियर लीगमध्येदेखील काम केले आहे.

## उथप्पाकडून 'बेबी बॉस'ची ब्रॅडमनशी तुलना

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा १५ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीने झिम्बाब्वे विरुद्धच्या टी-२० मालिकेत दोन अर्धशतकांसह सर्वाधिक धावा करत मालिकावीर पुरस्कार पटकावला. या ऐतिहासिक कामगिरीनंतर भारताचा माजी खेळाडू रॉबिन उथप्पाने वैभवच्या फलंदाजी तंत्राची तुलना थेट दिग्गज फलंदाज सर डॉन ब्रॅडमन यांच्याशी केली आहे.

भारताचा युवा स्टार फलंदाज वैभव सूर्यवंशीला इंग्लंडविरूद्ध झालेल्या टी-२० मालिकेत पदार्पण करण्याची संधी दिली गेली होती, पण या मालिकेत तो आपली छाप सोडू शकला नव्हता. त्यानंतर



झिम्बाब्वे विरुद्ध झालेल्या टी-२० मालिकेतून त्याने दमदार पुनरागमन केले. या मालिकेत तो सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. या मालिकेदरम्यान त्याने अनेक मोठे रेकॉर्ड आपल्या नावावर केले.

या पार्श्वभूमीवर उथप्पा म्हणाला, वैभव सूर्यवंशी इथून किती पुढे जाणार याचा अंदाज लावणे कठीण आहे, पण त्याची फलंदाजी करण्याची टेक्निक पाहून दिग्गज फलंदाज डॉन ब्रॅडमनची आठवण येते. उथप्पाच्या मते, वैभव आणि ब्रॅडमन यांची फलंदाजी करण्याची टेक्निक सारखीच आहे.

आपल्या युट्यूब चॅनेलवर बोलताना रॉबिन उथप्पा म्हणाला, आता सध्या काही सांगणे कठीण आहे, पण गोलंदाजांना अजूनही त्याची फलंदाजी करण्याची टेक्निक समजलेली नाही. त्यामुळे आपण अजून पाहायला हवे, कारण जेव्हा डॉन ब्रॅडमन फलंदाजी करायचे, ते बॉडीलाईनचा अधिक वापर करायचे. वैभवची टेक्निकसुद्धा अशीच आहे. त्यामुळे तो एलबीडब्ल्यू आऊट झालेला नाही.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com